दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१९७ | बुधवार दि.०७ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### आंदोलनाचा अधिकार की पोलिसी बळ? लोकशाहीची कसोटी

नाशिक ते मुंबई तब्बल १७० किलोमीटरची पदयात्रा करून आपल्या मागण्यांसाठी मंत्रालयाच्या दिशेने निघालेले आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थी आणि मुंबईत त्यांच्यावर झालेली पोलिसी कारवाई यामुळे लोकशाहीतील आंदोलनाच्या अधिकारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आश्रमशाळांतील भौतिक सुविधांचा अभाव, रखडलेली शिष्यवृत्ती आणि अन्य प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे विद्यार्थी मुंबईत आले होते. आझाद मैदानावर आंदोलनाला परवानगी न मिळाल्यानंतर त्यांनी दादर येथील काँग्रेसच्या टिळक भवनात आश्रय घेतला. त्यानंतर मध्यरात्री पोलिसांनी केलेल्या कारवाईने या घटनेचे गांभीर्य आणखी वाढवले.

## थोडक्यात...

### ज्ञानेश कुमार ताटाखालचे मांजर– विजय वडेट्टीवार

नागपूर: केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे देशात लोकशाही संपवण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या ताटाखालचे मांजर होऊन काम करत आहेत. मतदार यादीतील 'फॉर्म ६' मधील नियम बदलांना सुप्रीम कोर्टाने मान्यताच दिली नव्हती, हे उघड झाल्यानंतर आता कोर्टानेही निवडणूक आयोगाला फटकारले असल्याची टीका नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. नवी दिल्लीतील इंडिया आघाडीचा मोर्चा, मतदार यादीतील 'एसआयआर' घोटाळा, राज्यातील भीषण दुष्काळ व जलसंधारणातील ३८ हजार कोटींचा भ्रष्टाचार, एमपीएससी अध्यक्षांची चौकशी, मुंबई महापालिकेतील कंत्राटशाही आणि गोंदियातील रेशन तांदूळ घोटाळ्यावर सरकारला उघडे पाडले. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभारावर आणि दिल्लीतील इंडिया आघाडीच्या खासदारांच्या मोर्चावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले, एसआयआरच्या नावाखाली देशभरात उघडपणे मतचोरीचे काम सुरू होते. मोदी सरकारने ज्ञानेश कुमारांना केवळ एक मोहरा म्हणून वापरून संपूर्ण देश भडकावला आहे.

### आशुतोष दीक्षित होणार नवे वायुसेना प्रमुख

दिल्ली: एयर मार्शल आशुतोष दीक्षित यांची भारतीय वायुसेनेच्या पुढील प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारपासून एयर चीफ मार्शल पदाची जबाबदारी स्वीकारतील. त्यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत असेल. राष्ट्रपतींनी त्यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली आहे. दीक्षित सध्या वायुसेनेचे उपप्रमुख आहेत. त्यांनी १ जुलै २०२६ रोजी ही जबाबदारी स्वीकारली. ते विद्यमान वायुसेना प्रमुख एयर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांची जागा घेतील. अमर प्रीत सिंह ३१ ऑक्टोबरला निवृत्त होणार आहेत. दीक्षित यांना स्वदेशी हलके लढाऊ विमान 'तेजस' तसेच इतर स्वदेशी विमान प्रकल्पांना पुढे नेण्याच्या कामाचा अनुभव आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात वायुसेनेतील स्वदेशी तंत्रज्ञान आणि आत्मनिर्भरतेवर अधिक भर राहण्याची शक्यता आहे.

### तातडीने विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवा–पटोले

नागपूर: राज्यात यंदा १९७२ पेक्षाही अधिक भयानक आणि दाहक दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. विधानसभेत स्वत: मुख्यमंत्र्यांनी 'अल निनो'चा इशारा दिला होता; तरीही शेतकऱ्यांना महागडी खते, बनावट बियाणे विकून आधी लुटले आणि आता उभी पिके जळत असताना शासन नुसती पीक पाहणी करण्याचे दौरे करत आहे. दुष्काळ परिस्थितीवर शासनाने तातडीने विशेष अधिवेशन बोलवून शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केली. नाना पटोले यांनी राज्यातील तीव्र दुष्काळ, शेतकरी आत्महत्या, केंद्रीय निवडणूक आयोगातील गैरव्यवहार, धान–भरडाई महाघोटाळा, महायुतीतील अंतर्गत धुसफूस आणि 'लाडकी बहीण' योजनेवरून सरकारची दुटप्पी वृत्ती यावर सविस्तर भाष्य करत महायुती सरकारची कोंडी केली. राज्यातील बळीराजा आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे. अशा वेळी राज्यपालांकडे जाऊन टाईमपास करण्यापेक्षा सरकारने दुष्काळ आणि शेतकरी संकटावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे तातडीने किमान ३ दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे, असे ते म्हणाले

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ ऑक्टोबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५३.५० क्विंटल | २,७०० | ३,०६४ | २,८३६ |
| ज्वारी/हायब्रिड : ९३.५० क्विंटल | ३,२९० | ६,३९१ | ४,२९५ |
| मका/लोकल: १.५० क्विंटल | २,४३६ | २,४३६ | २,४३६ |
| तूर : ३०.५० क्विंटल | ९,००० | ९,७०१ | ९,४६० |
| उडीद : १३.५० क्विंटल | ८,३०० | ९,५२२ | ९,२५९ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | २,३०० | २,८२० | २,६८०४ |
| मुग: ७.०० क्विंटल (२,६०० २,४५२) | ७,८०० | ८,३६० | ८,०८० |
| सोयाबीन: १८७.०० क्विंटल | ५,९०० | ९,२०० | ६,३९९ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ६,००१ | ७,०५१ | ६,६६३ |

# दुष्काळ पाहणीसाठी केंद्राचे पथक लवकरच महाराष्ट्रात

## चार–पाच दिवसांत दौरा; १७ हजार कोटींच्या मदतीच्या मागणीवर राज्याच्या नजरा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील दुष्काळग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे पथक पुढील चार ते पाच दिवसांत महाराष्ट्रात दाखल होणार आहे. मुक्तानंद अगरवाल यांच्या नेतृत्वाखाली हे पथक दुष्काळी परिस्थितीची पाहणी करणार असून, शेतपिकांच्या नुकसानीचा आणि राज्यातील दुष्काळाच्या तीव्रतेचा आढावा घेतला जाणार आहे. केंद्राच्या या पथकाच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने केंद्राकडे मागितलेल्या १७ हजार कोटी रुपयांच्या मदतीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.**



राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, या तालुक्यांमध्ये शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे वेगाने सुरू आहेत. आतापर्यंत सुमारे ४३ टक्के पंचनामे पूर्ण झाले असून, उर्वरित पंचनामे १० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करत आहेत. भरणे म्हणाले, "२६५ दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांच्या नुकसानीचा आढावा घेतला जात आहे. महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पंचनामे करत आहेत. उर्वरित पंचनाम्यांचे कामही वेगाने सुरू आहे.'' विभागनिहाय पाहता छत्रपती संभाजीनगर विभागात ◀◀ पान २ वर

### आणखी १९ तालुक्यांचा फेरविचार

२६५ तालुक्यांव्यतिरिक्त आणखी १९ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याबाबत फेरविचार केला जात आहे. २५ सप्टेंबरच्या शासन निर्णयानुसार, ७५ टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान झाले असूनही दुष्काळाच्या निकषात न बसणाऱ्या तालुक्यांचा परिस्थितीनुसार विचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचे प्रस्ताव तातडीने पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## शिवसेना पक्ष-चिन्हाचा पेच कायम सर्वोच्च न्यायालयाचे शिंदे गटाला सवाल



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. ६) संघटनात्मक बहुमताच्या निकषावर महत्त्वाचे सवाल उपस्थित केले. एखाद्या पक्षाची संघटनात्मक रचना मुळातच अलोकशाही स्वरूपाची असेल, तर त्या रचनेनुसार पदांवरील नियुक्त्या कायदेशीर असू शकतात; मात्र, केवळ पदाधिकाऱ्यांची संख्या ही पक्षाला प्रत्यक्ष तळागाळात किती समर्थन आहे, याचे स्पष्ट प्रतिबिंब मानता येईल का, असा सवाल न्यायमूर्ती बागची यांनी केला.

शिंदे गटाच्या शिवसेनेच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. 'राणा खटल्याचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. पक्षात मोठ्या संख्येने नामनिर्देशित पदाधिकारी असतील, तर संघटनात्मक चाचणी हा योग्य निकष ठरणार नाही. अशा परिस्थितीत पदांची संख्या मोजली जाईल आणि ज्या गटाकडे सर्वाधिक पदे आहेत, त्यांच्याकडे बहुमत असल्याचे मानले जाईल,' असा युक्तिवाद कौल यांनी केला. अपात्रतेच्या परिस्थितीत विधानमंडळातील पक्ष अर्थात 'ङशस– ळीश्ररींळींश झरीीं' हा महत्त्वाचा निकष ठरू शकतो, असेही कौल यांनी न्यायालयासमोर ◀◀ पान २ वर

## निवडणूक आयोग कार्यालयावर विरोधकांचा महामोर्चा

# दिल्लीत जोरदार राडा!

### राहुल गांधी, प्रियंका गांधी पोलिसांकडून ताब्यात, ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

दिल्ली । प्रतिनिधी

मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करत मंगळवारी विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीने निवडणूक आयोग कार्यालयावर धडक मोर्चा काढला. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी सर्व अडथळे पार करत आंदोलकांसह निवडणूक आयोग कार्यालयाच्या दिशेने कूच केले. या वेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात जोरदार



घोषणाबाजी करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

संसदेच्या आवारातून सुरू झालेला हा मोर्चा 'निर्वाचन सदन'कडे जात असताना पोलिसांनी अनेक स्तरांवर बॅरिकेड्स लावून खासदारांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, राहुल गांधी यांनी अचानक एका ◀◀ पान २ वर

## एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनामा ऐवजी चौकशी करणार!

### मुख्यमंत्री फडणवीसांच्या वक्तव्याने नवे वळण, विद्यार्थ्यांच्या निर्णयाकडे लक्ष



मुंबई । प्रतिनिधी

एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा थेट राजीनामा घेण्याऐवजी त्यांच्या आणि संपूर्ण आयोगाच्या कामकाजाची चौकशी करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. आता या भूमिकेनंतर विद्यार्थ्यांचे आंदोलन कोणत्या दिशेने जाते आणि सरकारकडून चौकशीबाबत पुढील निर्णय कधी घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून सध्या पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. पेपरफुटीप्रकरणी आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा घ्यावा, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी आणि राज्यातील रिक्त पदांची भरती तातडीने करावी, अशा प्रमुख मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार हे मुख्यमंत्री देवेंद्र ◀◀ पान २ वर

## पशुधनाला वेळेत चारा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करा

### दुष्काळ आढावा बैठकीत ना.पंकजा मुंडे यांनी केल्या महत्वाच्या सूचना



मुंबई । प्रतिनिधी

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा उपलब्धतेचे वेळेत नियोजन करावे. त्यासाठी हायड्रोपोनिक्स, अझोला व सायलेज यांसारख्या पर्यायी चारा पद्धतींचा वापर करावा, यासह काही महत्वाच्या सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुष्काळविषयक आढावा बैठकीत केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी उपाययोजना, उपलब्ध पाणीसाठा आणि पीक–पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत शेतकरी व शेतमजुरांना ◀◀ पान २ वर

## पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या कॅम्प ऑफीसवर सीबीआयचा छापा

चंदिगढ । वृत्तसंस्था

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या कॅम्प ऑफिसवर केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मंगळवारी (दि. ६) छापा टाकला. मुख्यमंत्र्यांचे अधिकारी (ओएसडी) राजबीर घुमन यांच्याशी संबंधित एका प्रकरणात सीबीआयने ही कारवाई केल्याचे वृत्त 'एएनआय'ने दिले आहे. चंदीगडमधील सेक्टर–२ स्थित ५० क्रमांकाच्या बंगल्यावर ही छापेमारी करण्यात आली असून, हेच ठिकाण मुख्यमंत्र्यांचे कॅम्प ऑफिस म्हणून वापरले जाते.

कॅम्प ऑफिसवर सीबीआयची कारवाई झाल्याची माहिती मिळताच मुख्यमंत्री भगवंत मान यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर (ट्विटर) पोस्ट करत संताप व्यक्त केला. पंजाब सरकार आणि मला बदनाम करण्यासाठी राज्य सरकारविरुद्ध ईडी आणि सीबीआयचा गैरवापर केला जात आहे, असा थेट आरोप मान यांनी केला. अशा प्रकारच्या कारवायांमधून पंजाब सरकारची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी राजबीर सिंह घुमन यांच्याशी संबंधित प्रकरणात सीबीआय तपासाचे आदेश दिले होते. या न्यायालयीन आदेशानंतर सीबीआयने ही मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणाची मुळे अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) तपासात दडलेली आहेत. एक हाउसिंग सोसायटी आणि जमिनीचा वापर बदलण्याची परवानगी (सीएलयू – चेंज ऑफ लँड युज) ◀◀ पान २ वर

## आचारसंहिता काळात पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्याचे आदेश

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत बीड जिल्हा परिषदेने प्राथमिक पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्याचा आदेश काढण्यात आल्याबाबत चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, यांच्याकडे केली आहे.**

या संदर्भात म्हटले आहे की, महाराष्ट्र विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. शासकीय यंत्रणेकडून कोणतेही प्रशासकीय निर्णय, पदोन्नती अथवा आर्थिक परिणाम करणारे आदेश काढताना निवडणूक आचारसंहितेतील तरतुदींचे काटेकोर पालन करणे अपेक्षित आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित अधिकारी यांनी ८२ गणित–विज्ञान विषयाच्या शिक्षकांना प्राथमिक पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत आदेश दिनांक २५ सप्टेंबर २६ रोजी काढले आहेत. सदर आदेशासाठी उच्च न्यायालयाच्या याचिकेचा निर्णयाचा संदर्भ देण्यात आला आहे. जर सदर निर्णय सन २०२६ च्या सुरवातीला झालेला असेल, तर त्याची अंमलबजावणी त्याच वेळी किंवा त्यानंतरच्या योग्य प्रशासकीय प्रक्रियेद्वारे का करण्यात आली नाही? आणि आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीतच त्यावर आधारित आदेश काढण्याची आवश्यकता का निर्माण झाली? असा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने संबंधित निवडणूक प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली होती का? तसेच या आदेशामुळे किती आर्थिक लाभ होणार आहे, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात संबंधित कर्मचारी, अधिकारी तसेच आदेशास अंतिम मान्यता देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची भूमिका तपासण्यात यावी. आचारसंहितेच्या कालावधीत जाणीवपूर्वक किंवा नियमांची योग्य पडताळणी न करता सदर आदेश काढण्यात आला आहे का? याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी राम खाडे यांनी केली आहे.

## आता राज्य पोलिसांसाठी 'मुख्यमंत्री शौर्य पदक'

### धाडसी कामगिरी करणाऱ्यांना प्रोत्साहन, महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

कर्तव्य बजावताना जोखीम पत्करून साहसी आणि धाडसी कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अशा पोलिसांना आता 'मुख्यमंत्री शौर्य पदक' देऊन गौरविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली.

या सन्मानांतर्गत शौर्य पदक मिळवणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ५० हजार रुपये रोख, पदक आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. ◀◀ पान २ वर



## अग्रलेख

# आंदोलनाचा अधिकार की पोलिसी बळ? लोकशाहीची कसोटी

नाशिक ते मुंबई तब्बल १७० किलोमीटरची पदयात्रा करून आपल्या मागण्यांसाठी मंत्रालयाच्या दिशेने निघालेले आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थी आणि मुंबईत त्यांच्यावर झालेली पोलिसी कारवाई यामुळे लोकशाहीतील आंदोलनाच्या अधिकारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आश्रमशाळांतील भौतिक सुविधांचा अभाव, रखडलेली शिष्यवृत्ती आणि अन्य प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे विद्यार्थी मुंबईत आले होते. आझाद मैदानावर आंदोलनाला परवानगी न मिळाल्यानंतर त्यांनी दादर येथील काँग्रेसच्या टिळक भवनात आश्रय घेतला. त्यानंतर मध्यरात्री पोलिसांनी केलेल्या कारवाईने या घटनेचे गांभीर्य आणखी वाढवले.

लोकशाहीत आंदोलन करणे हा नागरिकांच्या अभिव्यक्तीचा आणि शांततापूर्ण निदर्शनांचा महत्त्वाचा मार्ग आहे. अर्थात, हा अधिकार निरंकुश नाही. सार्वजनिक सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षितता आणि कायद्याचे पालन यांचा विचार करून प्रशासनाला काही निर्बंध घालण्याचा अधिकार आहे. मात्र, निर्बंध लावताना प्रशासनाने आंदोलनाचा मूळ प्रश्न ऐकून घेण्याची जबाबदारीही पार पाडली पाहिजे. परवानगी नाकारली म्हणजे प्रश्न संपला, असे प्रशासनाला मानता येणार नाही. या घटनेतील सर्वांत गंभीर प्रश्न म्हणजे विद्यार्थ्यांना नाशिकपासून मुंबईपर्यंत १७० किलोमीटर पायी यावे लागलेच का? त्यांच्या मागण्या इतक्या काळ प्रलंबित का राहिल्या? आदिवासी विकास विभाग आणि विद्यार्थ्यांमध्ये नियमित संवादाची यंत्रणा असेल, तर विद्यार्थ्यांना राजधानीच्या दारात येऊन आंदोलन करण्याची वेळ का आली? हे प्रश्न केवळ विरोधकांचे राजकीय प्रश्न म्हणून बाजूला सारणे योग्य ठरणार नाही. मध्यरात्री राजकीय पक्षाच्या कार्यालयात झालेल्या पोलिसी कारवाईबाबतही कायदेशीर प्रक्रिया, प्रवेशाचे अधिकार, प्रतिबंधात्मक कारवाईचे निकष आणि संबंधित आदेश याबाबत पारदर्शकता आवश्यक आहे. प्रशासनाकडे कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे; मात्र त्या अधिकाराचा वापर कोणत्या परिस्थितीत, कोणत्या प्रक्रियेनुसार आणि कितपत करण्यात आला, याचे स्पष्टीकरणही सार्वजनिक असले पाहिजे. विशेषतः आंदोलनकर्ते विद्यार्थी असतील, तर त्यांच्याशी संवेदनशील पद्धतीने व्यवहार करण्याची अपेक्षा अधिकच वाढते. या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ पोलिसी कारवाईच्या चौकटीत पाहणेही अपुरे ठरेल. कारण या घटनेच्या मुळाशी आदिवासी आश्रमशाळांमधील मूलभूत सुविधांचे प्रश्न आहेत. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, निवास, अन्न, शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय आणि इतर सुविधांबाबत विद्यार्थ्यांना वारंवार मागण्या कराव्या लागत असतील, तर प्रशासनाच्या नियोजनाचीच कसोटी लागते. शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसेल, तर तांत्रिक अडचणींचे कारण सांगून विद्यार्थ्यांची जबाबदारी संपत नाही. व्यवस्था विद्यार्थ्यांसाठी आहे; विद्यार्थ्यांनी व्यवस्थेशी जुळवून घ्यावे, अशी भूमिका लोककल्याणकारी शासनाला घेता येणार नाही. सरकारसमोर दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. पहिला, आंदोलनादरम्यान कायदा-सुव्यवस्था कशी राखायची? आणि दुसरा, अशी आंदोलने करण्याची वेळच नागरिकांवर येऊ नये यासाठी प्रशासनाने काय केले? पहिल्या प्रश्नाचे उत्तर पोलिसांकडे असू शकते; मात्र दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर संबंधित विभागाला द्यावेच लागेल. आंदोलन दडपून रस्त्यावरची गर्दी कमी करता येईल; पण विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न कमी करता येणार नाहीत. पोलिसी कारवाईने एखाद्या रात्रीची परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते; मात्र आश्रमशाळेतील पाणी, शिक्षण, सुविधा आणि शिष्यवृत्तीचे प्रश्न त्याने सुटत नाहीत. म्हणून या घटनेत दोष कोणाचा, हे ठरवण्यापूर्वी काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत. विद्यार्थ्यांच्या मागण्या नेमक्या कोणत्या आहेत? त्यापैकी किती मागण्या मान्य केल्या आहेत? किती मागण्या प्रलंबित आहेत? आंदोलनाला परवानगी नाकारण्याचा आधार काय होता? मध्यरात्रीची कारवाई कोणत्या कायदेशीर प्रक्रियेनुसार झाली? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या विद्यार्थ्यांना पुन्हा मुंबईच्या रस्त्यावर यावे लागू नये यासाठी सरकारची ठोस कृती योजना काय आहे?

लोकशाहीची खरी ताकद आंदोलन थांबवण्यात नाही, तर आंदोलनाची गरजच कमी करण्यात आहे. सरकारने विद्यार्थ्यांचा आवाज ऐकला, त्यांच्या मागण्यांवर वेळबद्ध निर्णय घेतला आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी पारदर्शकपणे केली, तरच या घटनेतून सकारात्मक मार्ग निघू शकतो. अन्यथा आजचे आंदोलन संपेल; पण उद्याचे आंदोलन पुन्हा उभे राहील. लोकशाहीत शांतता महत्त्वाची आहे; पण प्रश्न न ऐकता मिळवलेली शांतता ही लोकशाहीची ताकद नसून केवळ तात्पुरती शांतता असते.

# सिंचनाचा विस्तार झाला असता तर दुष्काळाची तीव्रता कमी झाली असती का?

***महाराष्ट्रात यंदा पावसाने मोठी ओढ दिली आहे. १ जून ते २२ सप्टेंबरदरम्यान राज्यात ७८७.२ मिमी पाऊस झाला असून, सरासरी ९५३.२ मिमीच्या तुलनेत सुमारे १७ टक्के तूट नोंदली गेली. या पार्श्वभूमीवर राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाल्याचे २६ सप्टेंबरच्या वृत्तांत नमूद करण्यात आले आहे. पण या परिस्थितीकडे पाहताना एक मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ आली आहेजर महाराष्ट्रात अधिक व्यापक, कार्यक्षम आणि समतोल सिंचन व्यवस्था उभी राहिली असती, तर यंदाच्या कमी पावसाचा शेतीवर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम काही प्रमाणात कमी करता आला असता का? उत्तर सरळ 'हो' किंवा 'नाही' असे देता येणार नाही. मात्र उपलब्ध परिस्थिती पाहता, संरक्षित सिंचनामुळे दुष्काळाची तीव्रता कमी करण्याची क्षमता नक्कीच असते.***

पाऊस कमी असला तरी संकटाची तीव्रता समान का नसते? दुष्काळ म्हणजे केवळ पाऊस कमी पडणे नव्हे. पावसाचे वितरण, पावसातील खंड, जमिनीतील ओलावा, भूजलस्थिती, धरणांमधील पाणीसाठा आणि उपलब्ध सिंचनक्षमता या सर्वांचा परिणाम दुष्काळाच्या तीव्रतेवर होतो. यंदा महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये दोन ते तीन आठवड्यांचे दीर्घ कोरडे कालखंड नोंदवले गेले आहेत. अशा परिस्थितीत पिकांना निर्णायक टप्प्यावर एक-दोन संरक्षित पाण्याच्या पाळ्या मिळाल्या, तर संपूर्ण पीक वाचण्याची किंवा नुकसानाची तीव्रता कमी होण्याची शक्यता असते. म्हणजेच प्रश्न फक्त ''पाऊस किती पडला?'' एवढाच नसून पडलेल्या पावसातील किती पाणी आपण साठवले आणि गरजेच्या वेळी किती क्षेत्राला उपलब्ध करून दिले? हा देखील आहे. याचा अर्थ असा नाही की अधिक धरणे बांधली असती तर दुष्काळ पूर्णपणे टळला असता. मोठ्या धरणांबरोबर कालवे, वितरण व्यवस्था, लघुसिंचन, शेततळी, पाझर तलाव, भूजल पुनर्भरण आणि ठिबक सिंचन यांची साखळी आवश्यक असते. एका व्यापक जलव्यवस्थेत मोठे व मध्यम जलाशय, नदी जोड प्रकल्प, कालवा व वितरण व्यवस्था, लघुसिंचन प्रकल्प, शेततळी व जलसंधारण, भूजल पुनर्भरण, ठिबक व तुषार सिंचन, पाण्याचा पीकनिहाय कार्यक्षम वापर, आणि उपलब्ध पाण्यानुसार पीक नियोजन असे या सर्वांचा समन्वय असणे आवश्यक आहे. यापैकी एखादी कडी कमकुवत राहिली तर मोठा जलसाठा ही अपेक्षित परिणाम देऊ शकत नाही. दुष्काळात 'संरक्षित सिंचन' निर्णायक ठरू शकते. जर का आपण थोडा वेळ उत्तर अ महाराष्ट्रातील खान्देशच्या तुटीच्या खोऱ्याचा विचार केला तर तापी, गिरणा, नार, पार, पांझरा, बोरी, वाघूर आणि त्यांच्या उपनद्यांवरील नियोजित व मंजूर सिंचन योजना जसं पाडळसरे धरण, जामफळ कनोली योजना, प्रकाशा बॅरेज योजना, हतनूर धरण गाळ समस्या, नर्मदा सरोवर महाराष्ट्र हिश्श्याचे पाणी वळविणे, नार पार गिरणा नदीजोड अशा अनेक लहान मोठ्या अनेक योजना वेळेत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्या असत्या, तर दुष्काळाच्या काळात सुध्दा खान्देशाला नक्की मोठा फायदा झाला असता आणि तसं बघितलं गिरणा नदी तशी खान्देशाच्या मध्यवर्ती जलव्यवस्थेची एक मोठी कळी आहे परंतु त्यावरील नार पार व बलून बंधारा योजनासाठी अजून सुद्धा खूपच उशीर होत आहे, अशीच परिस्थिती उर्वरित उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा व विदर्भ मधील पूर्ण व अपूर्ण लहान मोठे अनेक प्रकल्प बद्दल असू शकते. दुष्काळाच्या काळात प्रत्येक पिकाला पूर्ण सिंचन देणे शक्य नसते. परंतु पेरणीनंतर पिकाच्या संवेदनशील अवस्थेत एक-दोन संरक्षित पाण्याच्या पाळ्या उपलब्ध झाल्या तरी नुकसानाची तीव्रता कमी होऊ शकते. यामुळे भविष्यातील सिंचन नियोजनाचा प्रश्न ''किती हेक्टर क्षेत्र सिंचित आहे?'' एवढ्यावर थांबता कामा नये. त्याऐवजी विचारला पाहिजे ''दुष्काळाच्या वर्षी किती क्षेत्राला खात्रीशीर संरक्षित सिंचन देता येते?'' हा मोजमापाचा अधिक उपयुक्त निकष ठरू शकतो. मात्र सिंचन वाढवताना सावधगिरीही आवश्यक आहे. सिंचन वाढवणे हा दुष्काळावरचा एकमेव उपाय नाही. पाण्याची उपलब्धता मर्यादित असताना पाणीखाऊ पिकांचे अनियंत्रित विस्तार झाले, तर भविष्यात भूजल आणि जलाशयांवर आणखी दबाव येऊ शकतो. त्यामुळे ''जास्त सिंचन'' पेक्षा ''शाश्वत आणि कार्यक्षम सिंचन'' ही दिशा महत्त्वाची आहे. ठिबक सिंचन, पिकांची योग्य निवड, जलसंधारण आणि स्थानिक जलचक्र पुनर्संचयित करणे यांना मोठ्या जलप्रकल्पांइतकेच महत्त्व द्यावे लागेल. आज महाराष्ट्रासमोरचा मोठा धडा असा आहे की, पाऊस अनिश्चित असू शकतो; पण जलव्यवस्थापनाचे नियोजन अनिश्चित असता कामा नये. यंदाच्या परिस्थितीत राज्यातील अनेक भागांना कमी पावसाबरोबर दीर्घ कोरडे कालखंडही सहन करावे लागले. त्यामुळे भविष्यातील जलनियोजनात केवळ सरासरी पावसावर आधारित गणित पुरेसे राहणार नाही. यंदाचा दुष्काळ संपल्यानंतर हा विषय पुन्हा विसरला जाऊ नये. महाराष्ट्रासाठी दीर्घकालीन 'दुष्काळ-प्रतिरोधक जलव्यवस्था' उभी करण्याची गरज आहे. प्रत्येक नदीखोरे, प्रत्येक जिल्हा आणि प्रत्येक तालुका यांची पर्जन्यमानाची रचना, जलसाठा, भूजल आणि पिकांची गरज वेगळी आहे. त्यामुळे एकच आराखडा संपूर्ण राज्याला लागू करण्याऐवजी स्थानिक जलनियोजनावर भर द्यावा लागेल. कमी पाऊस पडणे आपल्या हातात नाही; पण पडलेल्या पावसातील प्रत्येक थेंब साठवणे, जमिनीत मुरवणे आणि गरजेच्या वेळी योग्य पिकाला उपलब्ध करून देणे हे आपल्या नियोजनाच्या कक्षेत आहे. म्हणूनच आजचा खरा प्रश्न ''दुष्काळ का पडला?'' एवढाच नसून भविष्यात जर अश्याच दुष्काळाला सामोरे जावे लागले तर त्याची तीव्रता कमी करण्यासाठी आपण आज काय उभे करणार?'' याचे उत्तर तर साठवण क्षमता, कालवा-वितरण व्यवस्था, संरक्षित सिंचन, भूजल पुनर्भरण, जलसंधारण आणि पाण्याच्या कार्यक्षम वापराच्या प्रत्यक्ष परिणामांत दिसले पाहिजे. कारण दुष्काळ पूर्णपणे टाळता येणार नसेल, तरी दुष्काळाची झळ कमी करता येणे ही जल नियोजनाच्या यशाची खरी कसोटी ठरू शकते.



**भिला सोनू पाटील**
जल प्रहरी पुरस्कार विजेते, जल शक्ती मंत्रालय, भारत सरकार

# जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश अंबड तहसीलदार आणि तलाठ्याकडून दुर्लक्षित

**जालना | प्रतिनिधी**

**शासन नियमाप्रमाणे चार महिन्यापूर्वी जिल्हाधिकारी यांनी दिव्यांग व्यक्तीला २०० चौरस फूट जागा मंजूर केलेली आहे. सदरील सदरील जागेचे चलन शासनाला सुद्धा जमा करण्यात आलेले आहे. त्याचे आदेश माहितीस्तव सर्व जिल्हास्तरीय तालुकास्तरीय मंत्रालयापर्यंत पाठविण्यात आलेले आहे. परंतु तलाठी व तहसीलदार आदेशाचे मजाकाचा खेळ करीत आहे. जागा उपलब्ध असताना तसा अहवाल व पत्र तलाठी आणि तहसीलदार यांनी मान्य करून जागेचा ताबा देण्यासाठी पत्र पण देण्यात आलेले आहे परंतु जाणून-बुजून तलाठी अंबड दिव्यांग व्यक्तीला त्रास देऊन ताबा देत नाही. यासंदर्भात पालकमंत्री पी ए यांनी तहसीलदार यांना पण सूचना केलेले आहे त्याचे पण पालन तहसीलदार करीत नाही यासंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे जालना येथे आले असता त्यांना पण सर्व प्रकरणाची माहिती देण्यात आली त्यांना पण मान्य केले असून जागा देता येते म्हणून सदरील जागा शासनाची असून देण्याचा अधिकार शासनाला आहे परंतु कोणताही नियम नसताना तलाठी जागा ताबा देण्यासाठी जाणून-बुजून टाळाटाळ करीत आहे या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी तत्काळ लक्ष देऊन सदरील तलाठ्याची चौकशी करून जागा देण्यात यावी अशी शेवट मागणी दिव्यांग व्यक्ती यांच्याकडून करण्यात येत आहे.**

जालना जिल्हाधिकारी कार्यालयाने दिव्यांग प्रवर्गासाठी राखीव शासकीय जागेच्या भूखंड वाटपासंदर्भात महत्त्वाचा आदेश जारी केला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल (विल्हेवाट) नियमांनुसार पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात शासकीय भूखंड उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय व स्वावलंबनासाठी आवश्यक जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विभागांना आदेशाची अंमलबजावणी नियमानुसार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदरील आदेशाचे असूचनाचे पालन तलाठी करीत नसल्यामुळे सर्व झालेला लेखी पत्राची चौकशी करण्यात यावी चौकशी करून तलाठीला निलंबित करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.




## पान १ वरून...

### दुष्काळ पाहणीसाठी केंद्राचे

६८ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. पुणे विभागात ३० टक्के, तर नाशिक विभागात २२ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. कोकण विभागात पंचनाम्यांचे प्रमाण सर्वांत कमी असल्याचे भरणे यांनी सांगितले. दुष्काळाच्या प्रत्यक्ष पाहणीसाठी केंद्र सरकारचे पथक महाराष्ट्रात येत असल्याने या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य सरकारने केंद्राकडे दुष्काळ निवारणासाठी १७ हजार कोटी रुपयांच्या मदतीची मागणी केली आहे. केंद्राच्या पथकाकडून दुष्काळाची तीव्रता, पीकनुकसान आणि शेतकऱ्यांची परिस्थिती याचा आढावा घेतल्यानंतर पुढील मदतीचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे. केंद्राकडून यापूर्वीही राज्याला मदत मिळाली असल्याचे भरणे यांनी सांगितले. दरम्यान, राज्यात १७ सप्टेंबरपासून महिला शेतकरी धोरणाची सुरुवात करण्यात आली आहे. आतापर्यंत ३३ लाख महिलांनी अर्ज केले असून, यवतमाळ जिल्ह्यातून सर्वाधिक दोन लाख अर्ज प्राप्त झाल्याची माहितीही भरणे यांनी दिली.

-------------

### दिल्लीत जोरदार राडा!

बॅरिकेडवर चढून हातात राष्ट्रध्वज उंचावला. त्यांच्या या कृतीमुळे आंदोलकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. आंदोलन तीव्र होताच पोलिसांनी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वाड्रा यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांना ताब्यात घेऊन पोलीस बसमध्ये बसवले. मात्र, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी पोलीस बसमधून थेट बाहेर उडी मारली आणि पुन्हा निवडणूक आयोग कार्यालयाच्या दिशेने पायी जाण्यास सुरुवात केली. पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, निवडणूक आयोगाचे कार्यालय येथून अवघ्या ५० मीटर अंतरावर आहे, तरीही आम्हाला तेथे जाऊ दिले जात नाही. मला समजत नाहीये नक्की अडचण काय आहे. निवडणूक आयोगाचे काम निष्पक्षपणे निवडणुका घेणे हे आहे. सुमारे ३०० खासदार मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना भेटू इच्छितात, परंतु ते घाबरले आहेत. देशात नक्की काय चालले आहे, हेच कळत नाही. ते पुढे म्हणाले, जर जनतेच्या प्रतिनिधींनाच निवडणूक आयोगाला भेटू दिले जात नसेल, तर या लोकशाहीला काय अर्थ उरतो? 'लोकशाही वाचवा' असे फलक हातात घेऊन विरोधी पक्षाच्या खासदारांनी संसद भवनापासून निर्वाचन सदनापर्यंत मोर्चा काढला. या संपूर्ण आंदोलनामुळे दिल्लीत प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे खासदार कमालीचे आक्रमक झाल्याचे दिसून येत आहेत. निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे निघालेल्या राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांना दिल्ली पोलिसांनी बॅरिकेड्स लावून अडवल्यानंतर त्यांनी जवळच्या आकाशवाणी भवनमध्ये ठिय्या मांडला. या आकाशवाणी भवन आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयामध्ये केवळ ३०० मीटरचे अंतर आहे. दिल्ली पोलिसांनी या ठिकाणीही मोठा फौजफाटा तैनात केला होता.

**संजय राऊत यांना भोवळ... अनेक खासदारांना श्वसनाचा त्रास**

या आंदोलनावेळी शिवसेनेचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांना भोवळ आली. संजय राऊत यांच्याबरोबरच अजून काही खासदारांना श्वसानाचा त्रास झाल्याचे समोर आले आहे. वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकर, शाम कुमार बरगे यांना धक्काबुक्की झाल्याचा दावा करण्यात आला आहे. दिल्लीत मोठ्या प्रमाणावर ऊन असून अनेक लोकांची गर्दी झाल्यामुळे त्यांना त्रास झाला. संजय राऊत हे त्रास झाल्यानंतर घरी परतल्याचे सांगण्यात आले.

-------------------

### शिवसेना पक्ष-चिन्हाचा पेच कायम

मांडले. पक्षातील प्रतोदाच्या नियुक्तीवरून निर्माण होणाऱ्या परिस्थितीबाबतही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले. केवळ राजकीय पक्षाने एका व्यक्तीची प्रतोद म्हणून नियुक्ती केली आणि दोन-तीन सदस्यांनी दुसऱ्या व्यक्तीची प्रतोद म्हणून नियुक्ती केली, एवढ्याच कारणावरून संबंधित सदस्य दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २(१)(ब) अंतर्गत अपात्र ठरतील का, असा सवाल करण्यात आला. स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडण्याचा मुद्दा बाजूला ठेवला तरी पक्षाच्या निर्देशाविरोधात मतदान करून पक्षाने ते कृत्य माफ केले नाही, तर संबंधित सदस्य अपात्र ठरू शकतात. मात्र, एखाद्या प्रकरणात अपात्र ठरविण्याचा निर्णय चुकीचा असल्याचे न्यायालयाने नंतर घोषित केले, तर त्याचा पक्षचिन्हाच्या दाव्यावर काय परिणाम होईल, असा प्रश्नही न्या. बागची यांनी उपस्थित केला. अपात्र ठरविलेले सदस्य पक्षातून बाहेर गेले, तर उर्वरित सदस्यांना स्वतंत्र पक्षचिन्ह मिळू शकते का? अशा परिस्थितीत पक्षचिन्हाचा अधिकार कोणाला मिळायला हवा, याबाबतही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. घटनात्मकदृष्ट्या चुकीची कृती करणाऱ्या व्यक्तींसाठी पक्षचिन्हाचे महत्त्व काय राहते आणि त्यांनी घटनात्मकतेबाबत तक्रार केली असेल तर त्यांच्यावर कोणती कारवाई करता येईल, असे सवालही न्यायालयाने केले. दरम्यान, शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर पुढील दोन दिवसही सलग सुनावणी होणार आहे. उद्या आणि परवा शिंदे गटाच्या वतीने नीरज किशन कौल यांचा युक्तिवाद सुरू राहणार आहे.

--------------

### पशुधनाला वेळेत चारा उपलब्ध करून

केंद्रस्थानी ठेवून विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत समितीच्या सदस्य मंत्री पंकजाताई मुंडे, दत्तात्रय भरणे, मकरंद पाटील, नितेश राणे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, जयकुमार गोरे, प्रताप सरनाईक, गिरीष महाजन, बाबासाहेब पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अनेक महत्वाचे मुद्दे मांडले. वन विभागाच्या जमिनी, शासकीय प्रक्षेत्रे, विविध विभागांच्या अखत्यारीतील शासकीय क्षेत्रे तसेच विविध धरणांच्या बॅकवॉटरमधील गाळपेर क्षेत्रावर चारा पिकांची लागवड करण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात, असेही मंत्री मुंडे यांनी यावेळी मागणी केली.

**चारा आणि दुष्काळासाठी सीएसआरची मदत घेणार**

राज्यात दुष्काळ निवारणासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. पाणी असलेल्या ठिकाणी चारा बँक करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील विविध कंपन्याची सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून मदत घेतली जाणार आहे. सर्व तालुक्याला समान न्याय देण्यासाठी जास्तीत जास्त कंपन्यांनी सीएसआरसाठी मदत करण्याचे आवाहन मंत्री बावनकुळे यांनी यावेळी केले.

------------

### एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनामा

फडणवीस यांचे मित्र असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली जात नसल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला होता. या आरोपांवर आणि विद्यार्थ्यांच्या मागणीवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, एमपीएससी अध्यक्षांचा राजीनामा घेणे किंवा त्यांना पदावरून हटवणे हा अधिकार राज्य सरकारकडे नाही. संविधानातील तरतुदीनुसार एमपीएससी अध्यक्षांना हटवण्याची प्रक्रिया राष्ट्रपतींच्या माध्यमातून होते आणि त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची शिफारस आवश्यक असते. फडणवीस म्हणाले की, ज्या काळात पेपरफुटीची घटना घडली, त्या वेळी विवेक भीमनवार एमपीएससीचे अध्यक्ष नव्हते. ते पेपरफुटीनंतर अध्यक्षपदावर आले. त्यामुळे पेपरफुटीसाठी त्यांना थेट जबाबदार धरून त्यांना पदावरून हटवण्याची मागणी कितपत योग्य आहे, याचाही विचार करायला हवा. मात्र, विद्यार्थ्यांच्या मनात विश्वास निर्माण व्हावा यासाठी राज्य सरकारने चौकशीला विरोध नसल्याचे स्पष्ट केले आहे. सध्याचे अध्यक्ष, याआधीचे अध्यक्ष आणि संपूर्ण आयोगाच्या कामकाजाची चौकशी करण्याची सरकारची तयारी आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. चौकशीमध्ये आयोगातील कोणत्याही व्यक्तीकडून गैरप्रकार किंवा गैरवर्तन झाल्याचे सिद्ध झाले, तर संविधानातील कलम ३१७ नुसार पुढील कारवाई करण्यासाठी राष्ट्रपतींकडे शिफारस करण्यास सरकार मागेपुढे पाहणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी राज्यपालांकडेही राज्य सरकारने विनंती केली असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. त्यासाठी चौकशी समिती किंवा न्यायिक चौकशी आयोग स्थापन करण्याची तयारी सरकारने दर्शवली आहे. फडणवीस यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थ्यांच्या बहुतांश मागण्या मान्य करण्याची तयारी असताना केवळ राजकीय मुद्दा किंवा अहंकाराचा विषय बनवणे योग्य नाही. सरकारला कोणालाही वाचवायचे नाही. चौकशीत दोष आढळल्यास नियमानुसार पुढील कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**सरकारसह, पोलिस आणि आयोजकांना नोटीस, आज सुनावणी**

पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी आंदोलनांविरोधात पुणेकर नागरिकांनी थेट उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह, पोलिस आणि आयोजकांना नोटीस बजावली आहे. बुधवार, ७ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणी सुनावणी होणार आहे. आंदोलकांनी तात्काळ जागा सोडावी, आंदोलनकर्त्यांना निश्चित करून एक जागा द्यावी तसेच आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी याचिका न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

---------------

### आता राज्य पोलिसांसाठी

कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या पोलिसांसाठी मरणोत्तर शौर्य पदकाचीही तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री शौर्य पदकासाठी वर्षभरातील पोलिसांच्या साहसी कामगिरीचा विचार केला जाणार आहे. या पुरस्कारांची घोषणा दरवर्षी १ मे, महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला करण्याची तरतूद आहे. यंदाच्या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०२६ पासूनची कामगिरी विचारात घेतली जाणार असल्याचे मंत्रिमंडळ निर्णयात नमूद करण्यात आले आहे. मुख्यमंत्री शौर्य पदकासाठी प्रस्तावांची छाननी आणि निवड करण्यासाठी समित्यांची रचना करण्यात आली आहे. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक निवड समिती काम करणार आहे. जिल्हास्तरावरून पोलीस अधीक्षक संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षकांमार्फत प्रस्ताव पाठवतील. पोलीस आयुक्तांकडून प्रस्ताव थेट पोलीस महासंचालकांकडे सादर केले जातील. त्यानंतर गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती प्रस्तावांचा विचार करेल. अंतिम प्रस्ताव गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केला जाणार आहे. मंत्रिमंडळाने या योजनेसाठी निवड पद्धती, समित्यांची रचना आणि संबंधित खर्चाच्या तरतुदींनाही मंजुरी दिली आहे. राज्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या साहसी कामगिरीला राज्यस्तरावर स्वतंत्रपणे गौरविण्यासाठी ही योजना सुरू करण्यात येत आहे. विशेषतः जोखीम पत्करून कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांच्या कामगिरीची दखल घेण्यासाठी हा पुरस्कार दिला जाणार आहे.

------------

### पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या

देण्यातील कथित आर्थिक गैरव्यवहाराचा ईडीकडून तपास सुरू होता. या तपासादरम्यान राजबीर सिंह घुमन आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांची नावे समोर आली आहेत. त्यानंतर ईडीने पंजाब पोलिसांच्या महासंचालकांना (डीजीपी) तीन वेळा पत्र लिहून घुमन आणि त्यांच्या साथीदारांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली होती. दरम्यान, सीबीआयचे पथक मान यांच्या घरी पोहोचले. त्यांनी तपासणी सुरू केली. या छाप्यात कोणती कागदपत्रे किंवा इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही आणि तपास यंत्रणेने या कारवाईबाबत अद्याप अधिकृत तपशील जाहीर केलेला नाही.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.०७ ऑक्टोबर २०२६


## थोडक्यात

## शिवरत्न जिवाजी महाले जयंतीनिमित्त वडवणीत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**९ ऑक्टोबरला मोटारसायकल रॅली, ध्वजारोहण व वृक्षारोपण व१० ऑक्टोबरला भव्य मिरवणूक.**

वडवणी । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक म्हणून इतिहासात अजरामर ठरलेले शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त वडवणी शहरात शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समिती, वडवणी तालुका यांच्या वतीने विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या जयंती उत्सवात मोटारसायकल रॅली, भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण, वृक्षारोपण तसेच भव्य-दिव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवरत्न जिवाजी महाले जयंत उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



शुक्रवार दि.९ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वा. संत सेना महाराज मंदिर येथून मोटारसायकल रॅलीला सुरुवात होणार आहे. ही रॅली जिवाजी महाले चौकापर्यंत काढण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता शिवरत्न जिवाजी महाले चौकात भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. त्यानंतर वडवणी शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जयंती उत्सवाला सामाजिक उपक्रमाची जोड देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश या माध्यमातून देण्यात येणार आहे.

शनिवार दि.१०ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ वा. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून शिवरत्न जिवाजी महाले यांच्या प्रतिमेची भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. आकर्षक रथामध्ये जिवाजी महाले यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करून ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात येणार आहे. मिरवणुकीत दांडपट्टा पथक, बॅन्जो, हलगी पथक तसेच रथ हे विशेष आकर्षण राहणार आहे.

मिरवणुकीदरम्यान दांडपट्टा पथकाकडून तलवारबाजी, भाला, दांडपट्टा, लेझीम आदी विविध पारंपरिक युद्धकला व प्रात्यक्षिके सादर करण्यात येणार आहेत. त्यामुळे जयंती मिरवणुकीला ऐतिहासिक आणि पारंपरिक संस्कृतीचा अनोखा रंग पाहायला मिळणार आहे.'होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी'हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुरक्षेसाठी जिवाजी महाले यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उत्सवाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. जयंती उत्सवाच्या माध्यमातून ऐतिहासिक वारसा जपण्यासोबतच सामाजिक एकोपा, पर्यावरण संवर्धन आणि युवकांचा सक्रिय सहभाग यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पारंपरिक युद्धकलेच्या प्रात्यक्षिकांमुळे तरुण पिढीला आपल्या संस्कृती आणि इतिहासाची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.या दोन दिवसीय जयंती उत्सवात वडवणी तालुक्यासह परिसरातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समिती वडवणी तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कधी ओला तर कधी कोरडा, दुष्काळाने शेतकऱ्याला छळ छळ छळलय; मसाप मध्ये रंगले कवी संमेलन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषदेचा ३०० वा 'एक दिवस मराठीचा' या उपक्रमांतर्गत आयोजित कवी संमेलन दि ०५ ऑक्टोबर सोमवार रोजी चांगलेच रंगले. या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवी प्रभाकर साळेगावकर होते. यावेळी मसाप शाखेचे अध्यक्ष प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड, कार्यवाह किशोर गुंजकर, बालासाहेब झोडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कविसंमेलनात कवयित्री प्रा. संगीता जाधव यांनी

कधी ओला तर कधी कोरडा, दुष्काळाने शेतकऱ्याला

छळ छळ छळलय उभं आयुष्य त्याचं उन्हा तान्हात तळ तळ तळलय ही दुष्काळाच विदारक वर्णन करणारी कविता सादर केली. गौरी देशमुख यांनी

बरस रे मेघा बरस जरा वाचव मातीचा हा तुरा

बळीराजा जगला तरच हिरवा राहील देश सारा ही कविता सादर केली. उत्तम आवचार यांनी

जीवन माझे फिरते तुटलेल्या पतंगावानी सुख दुःखात झाली

जीवनाची एक कहाणी ही कविता सादर केली. डॉ. प्रज्ञा जोशी यांनी

फुटावी प्रतिभेला पालवी यावी जन्माला कविता

डोंगरदर्यातून सागराकडे जणू वाहत यावी कविता

ही कविता सादर केली. कवयित्री लता जोशी यांनी

वादळे, आवर्षने, तुफान वृष्टी यामुळे उजाडल्या धरेस तूच तार




दे ही प्रार्थना सादर केली. बालाप्रसाद चव्हाण यांनी

तहानल्या या वाड्या वस्त्या तहानले हे गाव रे

बरसायचे सोडून तुझी कुणीकडे धाव रे ही कविता सादर केली. डॉ. मीनाक्षी निळेकर यांनी

मिळे मराठी भाषेला

अभिजात हो दर्जा अभिमान वाटे सर्वा

लाभे सर्वांनाच ऊर्जा ही माय मराठीची थोरवी गाणारी कविता सादर केली. शेषनारायण राठोड यांनी व्यथा कोणापुढे मांडू

या या बळीराजाची पोट खपाटाला गेली

राजा सर्जाची ही शेतकऱ्यांचे विदारक चित्रण करणारी कविता सादर केली. शरद रांजवण यांनी

आता तर मी कित्येकदा

पावसात भिजलो ही कविता सादर केली.याशिवाय भवान देशमुख, डॉ.सारंग कुलकर्णी, अनुराधा खुर्पे, स्मिता कोथाळकर, प्रतिभा थिगळे, सारिका बेद्रे, दुर्गा राऊत, उषा पंडित, औदुंबर कातारे, सखाराम जोशी, डॉ. वैभव भगत, नीता राठोड, डॉ. प्रवीण काळे, गीता सोळंके, प्रकाश पत्की, भगवान धरपडे, खेलबा काळे, डॉ. विठ्ठल वाघ, गोविंद गोचडे, अश्विनी वाकणकर, दीपक पांढरे यांच्या कवितांना रसिकांनी भरभरून दाद दिली. यावेळी दुष्काळ, सामाजिक, राजकीय, अभंग प्रार्थना अशा विविध रचना कवींनी सादर केल्या. अध्यक्षीय समारोप करताना कवी प्रभाकर साळेगावकर म्हणाले की, कविता एकांतात लिहिलेले समूहाचे गाण असते. कवींच्या लेखनात टोकदारपणा येणे महत्त्वाचे आहे. दुष्काळाचे दुसरे नाव शेतकरी आहे. दुष्काळ जाहीर करावा लागतो, हे अतिशय दुर्दैवी आहे. शेतकरी आत्महत्यांपासून परावृत्त कसा होईल, यासाठी कवींनी प्रयत्न करावेत. यावेळी त्यांनी

गाड्यांचा ताफा

दुष्काळाची पाहणी मोडला वाफा यासह इतर हायकू सादर केले. या कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन ना.मा. पडलवार यांनी केले तर आभार किशोर गुंजकर यांनी मानले. यावेळी डॉ. नरेंद्र निळेकर, वरूण तौर, ज्ञानेश्वर पवार, पोलिस उपनिरीक्षक नरवडे, दत्ता पांडे, शेख सुलतान, यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## नित्रुड येथे मंत्री पंकजा मुंडेंकडून सोयाबीन पिकाची पाहणी

### दुष्काळग्रस्त भागातील शेती परिस्थितीची घेतली माहिती; शेतकऱ्यांशी साधला संवाद

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यातील नित्रुड येथे काल दि. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता मंत्री पंकजा मुंडे यांनी शेतकरी पांडुरंग जाधव यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी दुष्काळग्रस्त भागातील शेतीची परिस्थिती तसेच सोयाबीन पिकाच्या सद्यस्थितीची माहिती जाणून घेतली.




नित्रुड, पात्रुड, जायकवाडी फाटा परिसरातील शेतकऱ्यांना यंदाच्या हंगामात पावसाच्या अनियमिततेचा मोठा फटका बसल्याचे सांगण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री पंकजा मुंडे यांनी पांडुरंग जाधव यांच्या शेतात जाऊन सोयाबीन पिकाची पाहणी केली. पिकाची सद्यस्थिती, उत्पादनावर झालेला परिणाम तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींबाबत त्यांनी माहिती घेतली.

यावेळी भाजपा राज्य परिषद सदस्य अरुण आबा राऊत यांच्यासह माजी नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके, माधव निर्मळ, ज्ञानेश्वर मेंडके, किट्टी आडगाव मंडळ अध्यक्ष रुपाली ताई कचरे, पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजित सोळंके, माजलगांव मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपाखी, नितीन नाईकनवरे, संजय आंधळे, दीपक मेंडके, पांडुरंग झोडगे, अभय होके पाटील, दीपक नाना शिंदे, खय्युम पठाण, बाळासाहेब क्षीरसागर, शरद पवार, संजय पवार, दत्ता मामा महाजन, प्रदीप जाधवर, अनंत जगताप, बालासाहेब तेलगड, शेख आयुब, सचिन तौर, शुभम महात्मे, राम शिंदे, सिद्धेश्वर राठोड, रामेश्वर चव्हाण, तात्या पांचाळ यांच्यासह अनेक कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित शेतकरी व स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. पावसाच्या अनियमिततेमुळे सोयाबीन पिकाच्या उत्पादनावर झालेला परिणाम, शेतीतील अडचणी तसेच दुष्काळी परिस्थितीबाबत शेतकऱ्यांनी आपली व्यथा मांडली.

मंत्री पंकजा मुंडे यांनी नित्रुड परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन प्रत्यक्ष पिकाची पाहणी केल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये या दौऱ्याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्याच्या या दौऱ्याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रकरणांवर तातडीने कार्यवाहीचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेकडील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सेवाविषयक बाबींवर कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले असतानाही अशा प्रकरणांच्या निपटाऱ्यास होणाऱ्या विलंबाची गंभीर दखल ग्राम विकास विभागाने घेतली आहे. यासंदर्भात ग्राम विकास विभागाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी करून प्रभावी कार्यपद्धती राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

शासनाच्या निदर्शनास आले आहे की, सेवाविषयक बाबींवर वेळेत कार्यवाही न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांकडून न्यायालयात थेट दाद मागण्याचे प्रमाण वाढत असून, परिणामी न्यायालयीन प्रकरणांची संख्याही वाढत आहे. उच्च न्यायालय, नागपूर यांनीही जिल्हा परिषदांकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांचा नियमानुसार निपटारा करण्यासाठी एषषशलींळींश चशलहरपळीा निश्चित करण्याचे निर्देश दिल्याचा उल्लेख परिपत्रकात करण्यात आला आहे.

परिपत्रकानुसार, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अर्ज व तक्रारी स्वीकारण्यासाठी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दर सोमवारी दुपारच्या सत्रात एक तासाची वेळ निश्चित करावी, तसेच प्राप्त अर्जांच्या स्वरूपानुसार त्यावर तातडीने आणि विहित कालावधीत ठोस कार्यवाही करावी. शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची दक्षताही घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, संबंधित प्रकरणावर निर्णय घेतल्यानंतर अर्जदार कर्मचाऱ्यास लेखी स्वरूपात कळवून, घेतलेल्या निर्णयामागील नियम व कारणांचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अशा प्रकरणांचा दर महिन्याला आढावा घेऊन अनावश्यक विलंब टाळण्याची दक्षता घ्यावी, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

विभागीय आयुक्तांच्या अधिकारक्षेत्रातील प्रकरणांबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सविस्तर प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत १५ दिवसांच्या आत, आपल्या स्पष्ट अभिप्रायासह विभागीय आयुक्तांकडे पाठविण्याचे निर्देश आहेत.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्रातील प्रकरणांमध्ये कारणमीमांसेसह सविस्तर आदेश काढणे आणि त्या आदेशाविरुद्ध कर्मचाऱ्यास १५ दिवसांत विभागीय आयुक्तांकडे दाद मागण्याची संधी असल्याचे आदेशात स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त स्तरावर असे अपील प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसांत योग्य कार्यवाही करून प्रकरण निकाली काढावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे सेवाविषयक बाबींमध्ये कर्मचाऱ्यांना थेट उच्च न्यायालयात जाण्याची वेळ येऊ नये, हा शासनाचा उद्देश स्पष्ट होतो.

याशिवाय, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सेवाविषयक बाबींचे प्रस्ताव शासनाकडे न पाठविता मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावरच निकाली काढावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मार्गदर्शन आवश्यक असल्यास कोणत्या नियमाच्या किंवा शासन निर्णयातील कोणत्या विशिष्ट तरतुदीच्या अनुषंगाने मार्गदर्शन अपेक्षित आहे, हे स्पष्ट करूनच प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सेवाविषयक मार्गदर्शनाचे प्रस्ताव थेट शासनाकडे पाठवू नयेत, असेही परिपत्रकात नमूद आहे.

दरम्यान, न्यायालयीन प्रकरणांमध्ये जिल्हा परिषद किंवा विभागीय आयुक्त कार्यालयाची बाजू अचूक माहिती व निर्धारित वेळेत न्यायालयासमोर मांडण्याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. सेवाविषयक प्रकरणे कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याची असल्याने वेळोवेळी त्यांचे समुपदेशन करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

या परिपत्रकामुळे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सेवाविषयक प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी जबाबदारी, कालमर्यादा आणि अपीलची स्पष्ट प्रक्रिया निश्चित झाली असून, प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शासन परिपत्रक : ग्राम विकास विभाग, क्र. जिपसे-२०२६/प्र.क्र.४२०/ आस्था-७, दि. ५ ऑक्टोबर २०२६.

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत द्या अन्यथा काँग्रेसचा मोर्चा-राहुल जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

पावसाने दडी मारल्याने खरिप हंगाम पूर्णपणे संकटात सापडला असून पाटोदा तालुक्यातील सोयाबीन, कापूस, मूग, उडीद यासह विविध पिके करपून गेली आहेत. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला असताना केवळ पाहणी दौरे आणि पंचनाम्यांच्या प्रक्रियेत वेळ घालवण्याऐवजी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर सरसकट आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी केली आहे.



'वाळलेल्या काड्या पाहून काय साध्य होणार?'

पाटोदा तालुक्यात पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने शेतातील उभी पिके अक्षरशः जळून गेली आहेत. सोयाबीनच्या वाळलेल्या काड्या, करपलेला कापूस आणि पिकांची झालेली दुरवस्था पाहण्यासाठी मंत्री व लोकप्रतिनिधींचे दौरे सुरू आहेत. मात्र, या पाहणीमुळे शेतकऱ्यांच्या हाती प्रत्यक्ष मदत कधी येणार, असा सवाल राहुल जाधव यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या शेतातील वाळलेल्या सोयाबीनच्या काड्या पाहून नेमके काय साध्य होणार? शेतकऱ्यांना आता पाहणी नको, तर तातडीची मदत हवी आहे, असे जाधव यांनी म्हटले आहे.

पंचनाम्यांच्या नावाखाली वेळकाढूपणा नको

पाहणी दौरे आणि पंचनाम्यांच्या नावाखाली प्रशासनाकडून वेळकाढूपणा होऊ नये, अशी मागणीही त्यांनी केली. पाटोदा तालुक्यातील पिकांची परिस्थिती प्रत्यक्ष शेतात दिसून येत असताना पुन्हा पुन्हा कागदी सोपस्कार करण्यापेक्षा शासनाने वस्तुस्थिती लक्षात घेऊन तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा, असे जाधव यांनी सांगितले. शेतकऱ्यांवर खरीप हंगामातील नुकसान, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि आगामी दिवाळीचा आर्थिक ताण अशी अनेक संकटे एकाच वेळी आली आहेत. त्यामुळे दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे.

मदत न मिळाल्यास तीव्र आक्रोश मोर्चा

सरकारने पाहणी दौरे आणि कागदी प्रक्रियेपलीकडे जाऊन तातडीने मदतीची घोषणा करावी. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा झाली नाही, तर काँग्रेसच्या वतीने तीव्र आक्रोश मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा राहुल जाधव यांनी दिला.शेतकऱ्यांना आता आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. दिवाळीच्या तोंडावर शेतकरी आर्थिक विवंचनेत असताना सरकारने निर्णय घेण्यास आणखी विलंब करू नये, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## पान ६ वरुन...

### दुष्काळी परिस्थितीत

चार कोटी रुपयांचा सौरऊर्जा प्रकल्प तातडीने राबवावा. शहरातील बंद बोअरवेल, हातपंप आणि मोटारपंप तातडीने दुरुस्त करून पाणी उपलब्ध करून द्यावे. आगामी नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बंद पथदिवे दुरुस्त करावेत तसेच मंजूर सोलर मिनी हायमास्ट तातडीने बसवावेत. स्वच्छता विभागाने सर्व प्रभागांत वेळेवर घंटागाड्या पाठवून नाल्यांमधून उपसलेला कचरा तत्काळ उचलावा. पाण्याची भीषण टंचाई संपेपर्यंत सिमेंट रस्ते आणि नाल्यांच्या बांधकामांना तात्पुरती स्थगिती द्यावी. टंचाईच्या काळात दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करून तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा. यावेळी भाजपच्या बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, डॉ.ज्योतीताई घुंबरे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, माजी उपाध्यक्ष नसीर अन्सारी, नगरसेवक राणा चौहाण, शुभम धुत, ड. नागेश तांबारे, राजेंद्र गुजर, राहुल गुरखुदे, सनी माने, मुन्ना गायकवाड, नंदू पिंगळे, डॉ.लक्ष्मण जाधव, अनिल चांदणे, बाळासाहेब घोडके, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, शारेक जकेरिया, भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष शुभम कातांगळे, अमर विद्यागर, राजू महुवाले, सुशिल जाधव, डॉ.रमेश शिंदे, मिलिंद ठोकळ, किरण बेदरे, शिवराज शिरसाट आदी उपस्थित होते.

पाणीपुरवठा, विद्युत, स्वच्छता विभागप्रमुखांना धारेवर धरले

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर सर्व विभागप्रमुखांना बैठकीसाठी बोलावण्यात आले. यावेळी नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील विविध समस्यांचा पाढा वाचला. त्यानंतर डॉ.क्षीरसागर यांनी पाणीपुरवठा, विद्युत आणि स्वच्छता विभागप्रमुखांना धारेवर धरत कामकाजात तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. कामकाजात सुधारणा न झाल्यास निष्क्रिय अधिकाऱ्यांवर थेट कारवाई करावी, अशी सूचनाही त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना केली.

## पान ६ वरुन...

### नात्यांच्या दृढीकरणासाठी कुटुंबात

उद्देश सांगत, ज्या उद्देशाने संस्था स्थापन झाली तो उद्देश आजही कायम असल्याचे त्यांनी सांगितले. माजी विद्यार्थ्यांनी शाळा आणि संस्थेवर असलेल्या प्रेमाची उदाहरणे देत शाळा आजही त्याच जोमाने कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सी.बी.एस.ई. चे अध्यक्ष बाबू जोशी, सीताराम शर्मा, मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, महिला-पुरुष, माजी विद्यार्थी, सेवानिवृत्त शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्यभामा देवापूरकर यांनी केले, तर सूत्रसंचालन सुरेश रोकडे यांनी केले. कल्याणमंत्र रवींद्र खोडवे यांनी सांगितला. या मेळाव्यासाठी ७२ कुटुंबातील १०१ महिला, ११२ पुरुष आणि ३८ माजी विद्यार्थी असे एकूण २५१ जण उपस्थित होते. सहभोजनाने या कुटुंब मेळाव्याची सांगता झाली.

### बीड शहरामध्ये पाणी

स्वतःच्या मनानेच अवैध कनेक्शन लोकांना देतो . ज्याची कुठेही नोंद नसते. या सर्व गोष्टींना आळा बसणे गरजेचे आहे. काही काळापूर्वी शासनाने पाणीपुरवठा विभागाला प्रचंड मोठ्या स्वरूपामध्ये निधी उपलब्ध करून दिलेला आहे. त्या निधीमार्फत आता काय कामे चालू आहेत ? या निधीच काय करण्यात आल ? शहरांमध्ये व शहराच्या भोवती कुठेही काहीही काम करण्यात येत आहे असे काहीही दिसत नाही किंवा काही योग्य रचनात्मक कल्पक पद्धतीने पाणीपुरवठा विभागातून काही नवीन योजना केल्या जात आहेत असेही कुठेही दिसून येत नाही. बीड शहरातील अनेकानेक भागांना एक महिन्यापासून पिण्याचे पाणीच मिळालेले नाही. नगरपालिका प्रशासन आणि शासन बीड शहराच्या पाणी पुरवठ्या विषयी इतके का उदासीन आहे कळायला मार्ग नाही. प्रचंड गलथान कारभार या पाणीपुरवठा विभागांमध्ये चालतो हा आमचा गेल्या काही वर्षापासून चा अनुभव आहे. निवडणुका झाल्यावर केलेल्या डोंगरभर घोषणा धुळीला मिळाल्या. पुन्हा जैसे थे' तीच परिस्थिती. कारभारात सुधारणा काही होत नाही. शहरातील नागरिकही अशाच नेत्या पुढाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडतात ही मोठी खंत आहे, शोकांतिका आहे. सद्य परिस्थितीमध्ये आणि पुढच्या काळामध्ये बीड शहरामध्ये प्रचंड व भीषण पाणी टंचाई उद्भवणार आहे याचे संकेत आतापासूनच मिळू लागलेले आहेत. यासाठी तात्काळ पाण्याचे नियोजन व पाणीपुरवठ्या संबंधी इतर उपाययोजना राबवण्यात येण्याची अत्यंत गरज आहे. त्यासाठी रचनात्मक व कल्पकतेने योग्य आराखडे तयार करून सर्व लोकप्रतिनिधींनी योग्य त्या इच्छाशक्ती द्वारे काम करून येणाऱ्या काळामध्ये भीषण पाणी टंचाई आणि दुष्काळा बरोबर लढणे गरजेचे झालेले आहे. आजही योग्य पद्धतीने नियोजन करण्यात आले तर बीड शहराला आठ दिवसांमध्ये दोनदा पाणीपुरवठा करण्यात येऊ शकतो. परंतु नगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग व नगरपालिकेचे प्रशासन आणि शासन या बाबतीत प्रचंड उदासीन असल्याचे या निमित्ताने दिसून येते.

### वाळुंज जमीन प्रकरणात राम

ठिकाणी पोहोचल्या. तेथे सुरू असलेला वाद त्यांनी प्रत्यक्ष पाहिला आणि संबंधित व्यक्तींना परिस्थिती चिघळू नये, अशा शब्दांत समज दिल्याचे विष्णू खाडे यांनी सांगितले. त्यानंतर चर्चेतून व समन्वयातून संबंधित जमीन व पिकाबाबतचा वाद मिटविण्यात आला होता, असा त्यांचा दावा आहे.

घटनेला वेगळे स्वरूप देण्याचा प्रयत्न

ही घटना त्या काळातील स्थानिक वादापुरती मर्यादित होती. तिचा कोणत्याही जमीन व्यवहाराशी किंवा त्यानंतरच्या कथित वादाशी संबंध जोडणे योग्य नाही, असे विष्णू खाडे यांनी स्पष्ट केले. पूर्वीच मिटलेल्या या प्रकरणाला पुन्हा वेगळे स्वरूप देऊन सोशल मीडियावर गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

या घटनेशी प्राजक्ताताई धस किंवा आमदार सुरेश धस यांचा कोणत्याही प्रकारच्या जमीन व्यवहाराशी संबंध नसल्याचे खाडे यांनी ठामपणे सांगितले. केवळ एका कार्यकर्त्याने अडचणीच्या प्रसंगी मदतीसाठी दूरध्वनी केल्यामुळे प्राजक्ताताई संबंधित ठिकाणी गेल्या होत्या. त्या उपस्थितीचा अर्थ जमीन व्यवहाराशी संबंध असल्याचा काढणे चुकीचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

बनावट क्लिपच्या माध्यमातून बदनामीचा आरोप

दरम्यान, या जुन्या घटनेतील काही भागाचा आधार घेऊन प्राजक्ताताई धस यांना बदनाम करण्याच्या उद्देशाने बनावट किंवा संदर्भहीन क्लिप तयार करून सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याचा आरोप विष्णू खाडे यांनी केला. वास्तविक घटनेची पार्श्वभूमी आणि संपूर्ण घटनाक्रम न समजून घेता केवळ एखाद्या व्हिडिओच्या आधारे निष्कर्ष काढणे समाजात गैरसमज निर्माण करणारे ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.

आपण या गावचे माजी सरपंच असल्याने या संपूर्ण घटनेची प्रत्यक्ष माहिती आपल्याला असून, लवकरच या प्रकरणासंदर्भात अधिक सविस्तर माहिती व आवश्यक कागदपत्रे प्रसिद्धी माध्यमांसमोर मांडणार असल्याचेही विष्णू खाडे यांनी सांगितले.

दुसऱ्याच्या गावातील विषयावर बोलताना वस्तुस्थिती तपासा

दरम्यान, राम खाडे यांच्यावर टीका करताना विष्णू खाडे यांनी, दुसऱ्याच्या गावातील एखाद्या घटनेबाबत बोलताना त्या घटनेची प्रत्यक्ष माहिती किती आहे, उपलब्ध कागदपत्रे काय सांगतात आणि वास्तविक घटनाक्रम काय आहे, याची खातरजमा करणे आवश्यक आहे, असा सल्ला दिला. अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीच्या आधारे एखाद्या व्यक्तीचे नाव एखाद्या जुन्या प्रकरणाशी जोडणे योग्य नाही. त्यामुळे वाळुंज जमीन प्रकरणाकडे राजकीय किंवा सोशल मीडिया चर्चेच्या माध्यमातून नव्हे, तर उपलब्ध शासकीय कागदपत्रे, प्रत्यक्ष घटनाक्रम आणि वस्तुस्थितीच्या आधारे पाहावे, असे आवाहनही विष्णू खाडे यांनी केले आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत विष्णू खाडे यांनी लवकरच अधिकृत कागदपत्रांसह सविस्तर माहिती देणार असल्याचे सांगितल्याने या प्रकरणाला पुढील काळात कोणते वळण मिळते, याकडे लक्ष लागले आहे.

cmyk



# आता एका अर्जातूनच मिळणार २२ योजनांचा लाभ !

## पशुपालकांसाठी पशुसंवर्धन विभागाचा मोठा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

**पशुपालक, शेतकरी आणि ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांची अर्जप्रक्रिया आता अधिक सुलभ, पारदर्शक आणि पूर्णपणे डिजिटल करण्यासाठी जिपीआर लागू करण्यात आले आहे. ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पशुसंवर्धन विभागाच्या २२ वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाइन अर्जप्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या बदलामुळे वेगवेगळ्या योजनांसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची गरज कमी होणार असून, एका सामायिक अर्जातून एकापेक्षा अधिक योजनांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. अर्जदाराने दिलेल्या वैयक्तिक माहितीच्या आधारे त्याला कोणत्या योजनांसाठी पात्रता आहे, याची माहिती प्रणालीवर उपलब्ध होईल. त्यानंतर संबंधित योजनेचे आवश्यक पर्याय आणि कागदपत्रेच अर्जदाराला दाखविली जातील.**

**२२ योजनांचा एकत्रित समावेश :**

पशुसंवर्धन विभागाच्या योजनांचे एकत्रीकरण करून 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' या छत्राखाली राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय योजनांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये राज्यस्तरीय ११ आणि जिल्हा वार्षिक योजनांमधील १४ योजनांचा समावेश असून, त्यापैकी ९ राज्यस्तरीय आणि ९ जिल्हास्तरीय योजना वैयक्तिक लाभाच्या आहेत. याशिवाय पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी महामंडळ आणि गोसेवा आयोगाच्या योजनांचाही समावेश करण्यात आला आहे.



**कशासाठी मिळणार लाभ?**

या २२ योजनांमध्ये दुभत्या गायी-म्हशींचे गट वाटप, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन, अंडी उत्पादन, ब्रॉयलर प्रकल्प, इनक्युबेटर-हॅचर, वराहपालन, मुरघास संयंत्र, हायड्रोपोनिक चारा उत्पादन, मिनी टीएमआर उपकरण, कडबाकुट्टी यंत्र, कालवडी व पारड्यांसाठी पशुखाद्य, नर रेडकू संवर्धन, देशी बैलजोडी खरेदी, कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंगचा वापर, तसेच शेळी-मेंढी विकासाच्या विविध योजनांचा समावेश आहे. गोशाळांतील देशी गायींच्या पालनपोषणासाठी दररोज प्रतिपशू ५० रुपये अनुदान देणारी योजना स्वतंत्रपणे आहे.

**एका अर्जातून अनेक योजनांचा लाभ:**

नवीन जिपीआर मधील सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे अर्जदाराला प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही. एकच सामायिक अर्ज तयार करण्यात आला आहे. या अर्जामध्ये आधार क्रमांक, नाव, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, जात प्रवर्ग, लिंग, जमीनधारणा आदी माहिती घेतली जाणार आहे. एकूण ४४ प्रकारची माहिती अपेक्षित असून त्यापैकी २९ बाबी महाआयडी, ॲग्रिस्टॅक, स्वयं-सहायता गट डेटाबेस आणि आधाराशी संबंधित प्रणालींमधून ॲटो सुविधा देण्यात येणार आहे.

**पात्रतेनुसार योजना स्वत: दिसणार:**

अर्जदाराने सर्व योजनांची माहिती शोधण्याची गरज राहणार नाही. त्याच्या वैयक्तिक माहितीच्या आधारे प्रणालीवर पात्र असलेल्या योजनांची यादी उपलब्ध होईल. योजना निवडल्यानंतर त्या योजनेसाठी आवश्यक असलेली माहितीच कंडीशनल लॉजिक द्वारे दाखविली जाईल. त्यामुळे अनावश्यक माहिती भरण्याची गरज कमी होणार आहे.

**सातबारा, रेशनकार्डसह अनेक कागदपत्रे ऑनलाइनच :**

अर्जप्रक्रियेत कागदपत्रांचा भार कमी करण्यावरही शासनाने भर दिला आहे. लाभार्थ्याकडे फार्मर आयडी उपलब्ध असल्यास ७/१२ उतारा -ॲग्रीस्टीक मधून, बचत गटाची माहिती रेशनकार्डाची माहिती अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पोर्टलवरून आणि दिव्यांग प्रमाणपत्राची माहिती युडीआयडी पोर्टलवरून केली जाणार आहे. त्यामुळे ही कागदपत्रे पुन्हा स्वतंत्रपणे अपलोड करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**अर्जापासून मंजुरीपर्यंतची पद्धत :**

अर्ज सादर करण्यापासून छाननी आणि मंजुरीपर्यंतची प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आणि कागदपत्रविरहित करण्याचे नियोजन आहे. प्रत्येक टप्प्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी आणि कालमर्यादा म्हणजेच एसएलए निश्चित करण्यात येणार आहे. अर्जामध्ये त्रुटी असल्यास सेंड बॅक, पूर्वमंजुरी आणि अंतिम मंजुरी अशा महत्त्वाच्या टप्प्यांवर अर्जदाराला मराठी आणि इंग्रजी भाषेत एसएमएस व ई-मेलद्वारे सूचना मिळतील. त्यामुळे अर्ज नेमका कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती लाभार्थ्याला मिळत राहणार आहे.

**जनावरांची ऑनलाइन छाननी :**

योजनेच्या अंमलबजावणीमध्ये प्रत्यक्ष जनावरे आणि प्रकल्पस्थळाची पडताळणी करण्यासाठी मोबाईल ॲपद्वारे फोटो अपलोड करण्याची सुविधा ठेवण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष स्थळ आणि जनावरांची ऑनलाइन छाननी करणे शक्य होणार आहे.

**अनुदान थेट बँक खात्यात :**

पीएफएमएस आणि महाडीबीटीच्या एकत्रीकरणातून मंजूर अनुदान आधार-संलग्न बँक खात्यात थेट जमा केले जाणार आहे. त्यामुळे अनुदान वितरणाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा आहे.

**आधी लाभ घेतला आहे का, हेही प्रणाली तपासणार**

लाभार्थी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने यापूर्वी संबंधित योजनेचा लाभ घेतला आहे का, याची तपासणी प्रणालीच्या माध्यमातून केली जाणार आहे. त्यामुळे नियमांनुसार पात्र नसलेल्या लाभार्थ्यांना पुन्हा लाभ मिळण्यावर नियंत्रण येणार आहे.

# अंगोरा प्रजातीची शेळी पाळल्यास सर्वदृष्टीने भरभराट!



**राज्यासह देशभरात शेळीपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. प्रामुख्याने आपल्याकडे शेळीपालन व्यवसाय हा दुग्ध उत्पादन, मांस उत्पादन असे दोन प्रमुख उद्देश ठेऊन केला जातो. मात्र, जगभरात अशाही काही शेळ्यांच्या जाती आहेत, ज्या या दोन्ही उद्देश साध्य करण्यासोबतच लोकरच्या माध्यमातून विणकाम उद्योगासाठी देखील महत्वपूर्ण मानल्या जातात.**

**कोणते आहे मूळस्थान?**

शेळीची अंगोरा किंवा अंकारा शेळीची तुर्किश जात आहे. तिचे मूळस्थान तुर्कस्तान असून, ही शेळीची जात दिसण्याबाबत काहीशी मेंढीशी साधर्म साधते. या शेळीच्या केसांपासून 'मोहेर' म्हणून ओळखले जाणारे चमकदार फायबर तयार करते. थोडक्यात मोहेर म्हणजे शेळीच्या केसांपासून तयार होणारे रेशम होय. जे कापड निर्मिती आणि गरम कपड्यांची निर्मितीसाठी खूप प्रभावी मानले जाते. भारतात प्रामुख्याने जम्मू आणि काश्मीर या राज्यामध्ये या प्रजातीच्या शेळ्या आढळून येतात.

**तीनही मार्गाने आर्थिक फायदा:**

अंगोरा प्रजातीची शेळीचे आयुर्मान हे जवळपास १० वर्षांपेक्षा जास्त असते. इतर शेळ्यांच्या तुलनेत या प्रजातीची शेळी ही प्रजननक्षम नसते. अर्थात ही शेळी सर्वसाधारणपणे प्रत्येक वेळी एकाच करडाला जन्म देण्यास सक्षम असते. अर्थात मांस उत्पादनासाठी त्यामुळे फटका बसतो. मात्र, अंगोरा प्रजातीची केस हे साधारणपणे मेंढीप्रमाणे वर्षातून दोनदा कातरले जातात. यात एकदा प्रामुख्याने वसंत ऋतूमध्ये तर दुसर्यांदा शरद ऋतूमध्ये लोकर मिळते. अर्थात दुधासह मांस उत्पादन आणि लोकर उत्पादनामुळे या शेळीचे पालन करणे शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी मिळवून देणारे ठरते.

**काय आहेत 'या' शेळीची वैशिष्ट्ये?**

अंगोरा सामान्यतः इतर पाळीव शेळ्या आणि मेंढ्यांपेक्षा आकाराने लहान असते. या शेळीची दोन्ही शिंगे डोक्यावर वळलेली असतात. तर कान लांब आणि झुकलेले आहेत. तर या प्रजातीच्या शरीरावरील केस हे मजबूत, लवचिक फायबरसारखे असतात. मुख्यतः त्याच्या गुळगुळीतपणा आणि चमकदारपणामुळे ते इतर शेळ्या मेंढ्यापेक्षा महागडे आणि वेगळे ठरते.

# महत्त्वाचे व फायदेशीर नगदी फळ पीक : केळी लागवड



**केळी हे महाराष्ट्रातील आणि भारतातील एक महत्त्वाचे व फायदेशीर नगदी पीक आहे. तसेच जळगाव जिल्ह्यात केळीचे मोठ्या प्रमाणात पीक घेतले जाते.**

**हवामान आणि जमीन :**

हवामान: उष्ण व दमट हवामान (तापमान २-४० अंश सेल्सिअस). भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक असतो. जमीन: मध्यम ते भारी, काळी, उत्तम निचरा होणारी जमीन (सामू ६.५ ते ७.५). जमिनीत पाण्याचा साचलेपणा नसावा.

**महत्त्वाच्या जाती :**

ग्रँड नैन : निर्यातीसाठी आणि स्थानिक बाजारात सर्वाधिक पसंती. उच्च उत्पादन आणि उत्तम गुणवत्ता. श्रीमंती, बसराई, हरीसाल: स्थानिक बाजारासाठी उपयुक्त जाती.

**लागवडीचा काळ आणि पद्धत :**

काळ: जून-जुलै (मृग बाग). ऑक्टोबर-नोव्हेंबर (कांदे बाग). फेब्रुवारी-मार्च (आंबे बाग) .पद्धत: टिशू कल्चर (ऊती संवर्धन) रोपांचा वापर करणे सर्वात फायदेशीर ठरते. अंतर: .५ मी बाय १.५ मी (६ बाय ६ फूट) किंवा १.८ मी बाय १.५ मी (६ बाय ५ फूट). जोड ओळ पद्धत: ५ बाय ५ बाय ८ फूट अंतर (ठिबक सिंचन आणि आंतरपिकासाठी सोयीचे).

**खत व्यवस्थापन :**

सेंद्रिय खत: प्रति झाड १० ते १५ किलो चांगले कुजलेले शेणखत लागवडीच्या वेळी द्यावे. रासायनिक खत (प्रति झाड): नत्र (णीशर): २०० ग्रॅम. स्फुरद (डड्झ): ४०-५० ग्रॅम. पालाश (चजझ): २०० ग्रॅम हे डोस लागवडीपासून ३०, ६०, ९० आणि १२० दिवसांच्या अंतराने टप्प्याटप्प्याने द्यावेत.

**पाणी व्यवस्थापन :**

केळीला मुबलक पाण्याची गरज असते. ठिबक सिंचन: पाण्याचा कार्यक्षम वापर आणि खत देण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचाच वापर करावा. उन्हाळ्यात दररोज १५-२० लिटर प्रति झाड पाणी लागते.

**आंतरमशागत व काळजी:**

खांब देणे: घड मोठा झाल्यावर झाड कोलमडू नये म्हणून बांबूचा किंवा प्लास्टिक दोरीचा आधार द्यावा. कमळ कापणे : घडातील शेवटची फळ न धरणारी फुले (कमळ) कापावीत, यामुळे केळीचा आकार वाढतो. पिलबाग काढणे: मुख्य झाडाभोवती येणारे अनावश्यक सोके वेळोवेळी कापावेत.

**रोग व कीड नियंत्रण :**

करपा रोग : पानांवर तपकिरी ठिपके पडतात. नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा मँकोझेबची फवारणी करावी. सीएमव्ही (उचत - कीड/ व्हायरस): पानांवर पिवळे पट्टे येतात. बाधित झाडे उपटून नष्ट करावीत आणि मावा कीटकाच्या नियंत्रणासाठी फवारणी करावी.

**काढणी व उत्पादन :**

लागवडीनंतर सुमारे ११ ते १२ महिन्यांत केळीचे घड तयार होतात. उत्पादन: चांगल्या व्यवस्थापनाखाली प्रति झाड २५ ते ३० किलोचा घड मिळतो. प्रति एकरी सुमारे २५ ते ३० टन उत्पादन मिळू शकते.

# तूर पिकावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन

**तूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे कडधान्यवर्गीय पीक आहे. तुरीच्या डाळीचा समावेश आपल्या आहारामध्ये होतो. मागील काही वर्षांपासून तूर पिकाला चांगला बाजारभाव देखील मिळत आहे. काही भागामध्ये तूर फुलोरा अवस्थेमध्ये आहे. तूर पिकामध्ये विविध किडींचा प्रादुर्भाव होतो. किडींचा प्रादुर्भाव जास्त झाल्यास आर्थिक नुकसान होते. त्यामुळे पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी एकात्मिक कीड नियंत्रण महत्त्वाचे आहे.**



**तूर पिकावरील प्रमुख किडी :**

शेंगा पोखरणारी अळी/ घाटेअळी : ही अळी विविध पिकांवर दिसून येते. सध्या तूर पिकावर या किडीचे पतंग अंडी दिसू लागले आहेत. ही अळी नवीन कळ्या तसेच शेंगा खाते. कळी अवस्थेपासून ते शेंगा पक्वतेपर्यंत ही अळी तूर पिकावर दिसून येते. त्यामुळे या अळीमुळे पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. पिसारी पतंग : पाऊस संपल्यानंतर तूर पिकावर सर्वात आधी या किडीचा प्रादुर्भाव होतो. ही अळी तुरीच्या कळ्या, फुले यांना नुकसान करते, त्यानंतर शेंगानाही नुकसान करते. शेंगमाशी : ही कीड तूर पिकाला शेंगा लागण्याच्या सुरुवातीला निमुळते अंडे शेंगाच्या पापुद्र्याच्या आत घालते. त्यातून अळी बाहेर पडते. ही कीड तुरीच्या आतील शेंगा पोखरते. ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी : या किडीचा प्रादुर्भाव फुलोरावस्थेमध्ये होतो. या किडीच्या अंगावर ठिपके दिसतात. शेंगा ढेकूण : हा ढेकूण पानामधील तसेच शेंगामधील रस शोषण करतो. पाने गुंडाळणारी अळी : ही पाने गुंडाळणारी अळी पानांचा गुच्छ तयार करते. त्यानंतर पाने खाते. या अळीच्या प्रादुर्भावामुळे अपेक्षेप्रमाणे फुलधारण होत नाही. पट्टेरी भुंगेरे : तूर पिकाला फुले लागल्यानंतर पट्टेरी भुंगेऱ्यांचा प्रादुर्भाव होतो. हे भुंगेरे फुले व फुलातील परागकण खातात. खोडमाशी : खोडमाशीच्या प्रादुर्भावामुळे तुरीचे वाढणारे खोड मलूल होतो. ज्या ठिकाणी पाणी साचले आहे, पिकाची वाढ कमी झाली आहे तसेच तूर व सोयाबीन आंतरपीक असल्यास या खोडमाशीचा प्रादुर्भाव जास्त होतो.

**किडीचे एकात्मिक व्यवस्थापन :**

पाने गुंडाळणाऱ्या अळीची प्रादुर्भावग्रस्त पाने गोळा करून अळीसहित नष्ट करावीत. शेताच्या बांधावरील तुरीच्या शेंगा पोखरणाऱ्या अळीची पर्यायी खाद्यतणे उदा. कोळशी, रानभेंडी, पेटारी ही तणे वेळोवेळी काढून नष्ट करावीत. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या वेचून त्यांचा नाश करावा. पक्ष्यांना बसण्यासाठी हेक्टरी ५० ते ६० पक्षीथांबे शेतात लावावेत. शेंगा पोखरणाऱ्या अळीसाठी पीक कळी अवस्थेत आल्यापासून हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे आणि पोत्यावर पडलेल्या अळ्या वेळोवेळी गोळा करून नष्ट कराव्यात. पीक कळी अवस्थेत असताना निंबोळी अर्क ५ टक्केची फवारणी करावी. पीक ५० टक्के फुलोऱ्यात असताना मेटॅरीझीयम अनिसोप्ली हे बुरशीयुक्त कीडनाशक २ ते ३ मि.ली. व राणीपाल (०.०१ टक्के द्रावण) १ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. शेंगा पोखरणारी हिरवी अळी लहान अवस्थेत असताना एच.ए.एन.पी.व्ही. विषाणूची २५० एल. ई. प्रति हेक्टर प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी.

**कीड व किडींची आर्थिक नुकसानीची पातळी :**

शेंगा पोखरणारी अळी : २ ते ३ दिवसात सलग ८ ते १० दिवस पतंग आढळून आल्यास किंवा फुलोरा अवस्थेत १ ते २ अळी प्रति झाड किंवा १० टक्के किडलेल्या शेंगा आढळल्यास. पिसारी पतंग : २ ते ३ अळी प्रति झाड आढळल्यास शेंगमाशी : ५ टक्के प्रादुर्भावग्रस्त शेंगा आढळून आल्यास.

**ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी : १ ते २ गुंडाळी प्रति झाड आढळून आल्यास.**

रासायनिक पद्धतीने कीड नियंत्रण :

किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या वर गेल्यावर रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. शेंगा पोखरणारी अळी : फ्ल्यूबॅडामाईड ३९.३५ एससी २ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी ३ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा इमामेक्टिन बेन्झोएट ५ एसजी ४.४ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा स्पिनोसॅड ४५ एससी २ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. शेंगा पोखणराणी अळी व शेंगमाशी : लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ईसी १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा ल्युफेन्युरोन ५.४० ईसी १२ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २८ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. शेंगा पोखरणारी अळी, पिसारी पतंग, शेंगमाशी व पाने गुंडाळणारी अळी : इंडाक्झाकार्ब १५.८ ईसी ६.६६ मि.ली. प्रति १० लिटर पाणी किंवा नोवॅल्युरॉन ५.२५ + इंडोक्झाकार्ब ४.५० एसी हे कीटकनाशक १६.५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. शेंग ढेकूण : डायमेथोएट ३० टक्के हे कीटकनाशक १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### वेद दिन

### महत्वाच्या घटना

१६७९ : सिद्दी जौहर आणि इंग्रजांचा मारा रोखत मराठ्यांनी खांदेरी किल्ल्याभोवती एक मीटर उंचीचा तट उभारून पूर्ण केला.
१८१४ : दुसर्या बाजीरावाने पांडुरंग कोल्हटकराच्या साहाय्याने 'उंदेरी-खांदेरी' किल्ल्यांचा ताबा परत मिळवला.
१८२२ : ब्राझिलला (पोर्तुगालपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९०६ : 'बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. ही भारतात स्थापन झालेली पहिली स्वदेशी व्यापारी बँक आहे.
१९२३ : आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलिस आयोग (आय. सी. पी. सी) ची स्थापना व्हीयना येथे करण्यात आली.
१९३१ : दुसर्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९७८ : मधुमेह नियंत्रित करण्यासाठी उपयोगी पडणारे इन्सुलिन प्रथमच जनुक अभियांत्रिकी पद्धतीने तयार करण्यात यश.
१९७९ : दिवाळखोरी टाळण्यासाठी 'ख्रायसलर कॉर्पोरेशन'ने अमेरिकन सरकारकडे १ बिलियन डॉलर्सची मागणी केली.
२००५ : इजिप्तमधे पहिल्यांदाच बहुपक्षीय सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या.
२००९ : भारतीय बिलियर्डस खेळाडू पंकज अडवाणी यांनी वर्ल्ड प्रोफेशनल बिलियर्ड्सचे जेतेपद जिंकले.
२०१८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे नीती आयोग द्वारे आयोजित वैश्विक गतिशीलता शिखर संमेलनाचे उद्घाटन केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : उमाजी नाईक पहिला क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ३ फेब्रुवारी १८३२)
१८०७ : न्यूझीलंड देशाचे पहिले पंतप्रधान हेन्री सिवेल यांचा जन्म. (मृत्यू: १४ मे १८७९)
१८८७ : साहित्य अकादमी पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय संस्कृत विद्वान आणि महान दार्शनिक संस्कृत-तंत्र अभ्यासक, भारतीय शास्त्रज्ञ आणि तत्वज्ञ गोपीनाथ कविराज यांचा जन्मदिन.
१८२२ : रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ, कर्ते समाजसेवक आणि कुशल धन्वतंरी, ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थी (मृत्यू: ३१ मे १८७४)
१८२६ : बंगाल नवजागृतीचे प्रसिद्ध भारतीय बंगाली भाषिक लेखक राजनारायण बसु यांचा जन्मदिन.
१८४९ : बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, ग्वाल्हेर गायकीचा महाराष्ट्रात प्रचार केला (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९२७)
१९१२ : डेव्हिड पॅकार्ड ह्युलेट पॅकार्ड कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २६ मार्च १९९६)
१९१५ : डॉ. महेश्वर नियोग प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९५)
१९१७ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय चिकित्सक व वैज्ञानिक बानो जहाँगीर कोयाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : भानुमती रामकृष्ण तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (मृत्यू: २४ डिसेंबर २००५)
१९३३ : इला भट्ट मॅगसेसे पारितोषिक विजेत्या समाजसेविका, वकील व 'सेवा' ' या संस्थेच्या संस्थापिका
१९३४ : सुनील गंगोपाध्याय बंगाली कवी व कादंबरीकार (मृत्यू: २३ आक्टोबर २०१२)
१९३४ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (मृत्यू: २५ जुलै २०१२)
१९४० : चंद्रकांत खोत लेखक व संपदक
१९६३ : अशोकचक्र पुरस्कार सन्मानित शूरवीर भारतीय वैमानिक नीरजा भनोट यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-इंग्लिश अकाउंटंट आणि राजकारणी आलोक शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०१ : विल्यम शेक्सपियर यांचे वडील जॉन शेक्सपियर यांचे निधन.
१८०९ : थायलंडचा राजा बुद्ध योद्फा चुलालोके यांचे निधन.
१९५३ : भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ 'फुलारी' ऊर्फ 'बी. रघुनाथ' लेखक व कवी (जन्म: १५ ऑगस्ट १९१३)
१९७९ : जनार्दन ग्यानोबा तथा 'जे. जी.' नवले भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे पहिले यष्टिरक्षक(जन्म: ७ डिसेंबर १९०२)
१९९१ : रवि नारायण रेड्डी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' चे सहसंस्थापक (जन्म: ५ जून १९०८)
१९९४ : टेरेन्स यंग, चिनी इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (जन्म: २० जून १९१५)
१९९७ : मुकूल आनंद तांत्रिक करामतीचे जादूगार म्हणून नाव कमावलेले हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: ११ आक्टोबर १९५१)
१९९८ : गुजरात, मध्य प्रदेश आणि पॉन्डिचेरी या केंद्र शासित प्रदेशाचे माजी राज्यपाल के. एम चांडी यांचे निधन.
२०१३ : भारतीय परराष्ट्र सचिव, दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटांचे माजी उपराज्यपाल आणि त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचे निधन.

cmyk

# वीज कंपनीचा ग्राहकाला शॉक: पैसे घेऊनही कनेक्शन नाही; ग्राहक आयोगाचा दणका

जालना । प्रतिनिधी

शेतीसाठी वीज कनेक्शनची संपूर्ण रक्कम भरूनही पायाभूत सुविधा न पुरवल्याने एका शेतकऱ्याला झालेल्या त्रासाबद्दल जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने वीज वितरण कंपनीला जोरदार दणका दिला आहे. मध्यानचल विद्युत वितरण निगम लिमिटेडला सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धतीसाठी जबाबदार धरत, आयोगाने शेतकऱ्याला ७५,००० रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आ१९णि ४५ दिवसांच्या आत वीज जोडणी करण्याचे आदेश दिले आहेत. या निकालामुळे वीज कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप बसला असून, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण झाले आहे.

या प्रकरणात, तक्रारदार मुकेश कुमार यांनी आपल्या शेतातील बोअरवेलसाठी खाजगी ट्यूबवेल वीज कनेक्शन मिळावे म्हणून १९ जुलै २०२४ रोजी ऑनलाइन अर्ज केला होता. त्यासाठी त्यांनी १०० रुपये प्रक्रिया शुल्कही भरले. वीज कंपनीने जागेची पाहणी करून ट्रान्सफॉर्मर, खांब आणि तारांसाठी १,८३,०९२ रुपयांचे अंदाजपत्रक दिले. रब्बी पिकाच्या सिंचनाची सोय व्हावी, या हेतूने मुकेश कुमार यांनी १३ ऑगस्ट २०२४ रोजी संपूर्ण रक्कम कंपनीकडे जमा केली. मात्र, पैसे भरल्यानंतरही त्यांना वीज जोडणीसाठी ५०० हून अधिक अर्जदार रांगेत असल्याचे समजले. कंपनीने आवश्यक साहित्य उपलब्ध नसतानाही आणि जोडणीस विलंब होणार असल्याची कोणतीही माहिती न देता संपूर्ण रक्कम स्वीकारली होती, असा आरोप तक्रारदाराने केला.

या दिरंगाईमुळे गहू पिकाला पाणी देण्यासाठी शेतकऱ्याला महागड्या १० एचपी डिझेल जनरेटरचा वापर करावा लागला. यामुळे त्यांचा खर्च तर वाढलाच, पण पर्यावरणाचेही नुकसान झाले. वेळेवर सिंचन न झाल्याने शेतीच्या उत्पादकतेवर गंभीर परिणाम झाला आणि भविष्यातील पिकांचे नियोजनही धोक्यात आले. कंपनीने पैसे स्वीकारल्यानंतरही सेवा न दिल्याने अखेर मुकेश कुमार यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे धाव घेतली आणि नुकसान भरपाईची मागणी केली. आयोगाने नोटीस बजावूनही वीज कंपनी सुनावणीसाठी हजर राहिली नाही, त्यामुळे आयोगाने हे प्रकरण एकतर्फी चालवले.

आयोगाने आपल्या निरीक्षणात म्हटले आहे की, तक्रारदाराने संपूर्ण रक्कम जमा केली होती, ही वस्तुस्थिती निर्विवाद आहे. त्यामुळे, पैसे स्वीकारल्यानंतर वाजवी वेळेत काम पूर्ण करणे हे वीज कंपनीचे करारानुसार बंधन होते. लखनौ डेव्हलपमेंट अथॉरिटी विरुद्ध एम. के. गुप्ता या खटल्याचा संदर्भ देत आयोगाने स्पष्ट केले की, सार्वजनिक प्राधिकरणाने पैसे स्वीकारल्यानंतर आपले कर्तव्य पार न पाडणे ही सेवेतील त्रुटी आहे. साहित्याची अनुपलब्धता, कामाला लागणारा वेळ आणि मोठी प्रतीक्षा यादी यासारख्या महत्त्वाच्या बाबी लपवून कंपनीने ग्राहकाची दिशाभूल केली. अशा प्रकारे ग्राहकाला अनिश्चित काळासाठी थांबायला लावणे हे ग्राहक हक्कांचे उल्लंघन आहे, असेही आयोगाने नमूद केले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना **नोटरी असोसिएशन, जालनाचे अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत** म्हणाले, हा निकाल म्हणजे ग्राहक हक्कांचा मोठा विजय आहे. सार्वजनिक सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांनी अधिक जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने वागले पाहिजे, हे यातून स्पष्ट होते. अनेकदा वीज कंपन्या किंवा इतर सेवा प्रदाते पैसे स्वीकारतात, पण वेळेवर सेवा देत नाहीत. अशा वेळी ग्राहकांनी जागरूक राहिले पाहिजे. कोणताही व्यवहार करताना त्याची लेखी नोंद ठेवावी, पावत्या सांभाळून ठेवाव्यात आणि शक्य असल्यास सर्व कागदपत्रांची नोटरी करून घ्यावी. नोटरी केलेले दस्तऐवज कायदेशीर लढाईत महत्त्वाचा पुरावा ठरतात.

## एक हेक्टर शेतातील डांगर पाण्याअभावी मातीमोल



पाथर्डी प्रतिनिधी

मालेवाडी येथील विठ्ठल कीर्तने यांच्या एक हेक्टर जवळपास चार लाख रुपये उत्पादित शेतातील डांगर पाण्याअभावी मातीमोल झाले आहे टँकरने पाणी देऊन डांगर लावला पावसा व पाण्याअभावी वाढ खुंटल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे पाथर्डी तालुक्यात यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे मालेवाडी येथील विठ्ठल किर्तने यांनी पाण्याअभावी टँकरने पाणी विकत घेऊन डांगर पिकाची लागवड केली मात्र मोठा खर्च करूनही डांगराची अपेक्षित वाढ झाली नसल्याने उभ्या एक हेक्टर मधील लागवड केलेल्य डांगर अडचणीत सापडला आहे पिकाला वेळेवर पाणी मिळावे यासाठी विठ्ठल किर्तने यांनी टँकरने पाणी आणून डांगराचे पीक जगविण्याचा प्रयत्न केला मात्र प्रतिकूल हवामान आणि पाण्याची कमतरता यामुळे डांगराची योग्य वाढ झाली नाही त्यातच बाजारात मालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने आणि कर्ज काढून पीक घेतले मात्र हातातोंडाशी आलेले पीक अपेक्षित उत्पन्न देत नसल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

# भाजपा जालना महानगरच्या वतीने भव्य 'विकसित भारत संकल्प सभा'

जालना । प्रतिनिधी

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील जनसेवेच्या २५ वर्षपूर्तीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत भाजपा जालना महानगरच्या वतीने 'विकसित भारत संकल्प सभे'चे आयोजन बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता वीर सावरकर चौक, जालना येथे करण्यात आले आहे.



मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या राष्ट्रसेवेची २५ वर्षे हा देशाच्या सार्वजनिक जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पा असून, या निमित्ताने जालना शहरात ही भव्य सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे व्हर्च्युअल माध्यमातून संबोधित करणार आहेत.

यावेळी विकसित भारताचा संकल्प, आत्मनिर्भर भारताची वाटचाल, केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांचा नागरिकांना मिळणारा लाभ, विकासकामे तसेच देशाच्या विकासासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवतजी कराड हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास माजी केंद्रीय राज्यमंत्री मा. रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर, आ. नारायणजी कुचे, आ. संतोष पाटील दानवे, मा. आ. कैलासजी गोरंट्याल, मा. आ. विलास बापू खरात, प्रदेश सचिव मा. राहुल भैय्या लोणीकर तसेच मा. सतीश घाटगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २५ वर्षांत गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी संधी, शेतकरी कल्याण, पायाभूत सुविधा, आत्मनिर्भरता आणि विविध जनकल्याणकारी योजनांच्या माध्यमातून देशाच्या विकासाला चालना देण्यात आली आहे. या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच 'विकसित भारताच्या संकल्पनेला अधिक बळ देण्याच्या उद्देशाने या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेस भाजपा पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, विविध आघाड्या व मोर्चांचे पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख तसेच जालना शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

## शिक्षण आणि सामाजिक जीवनात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करावा-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगुन, दैनंदिन व्यवहार, शासकीय कामकाज, शिक्षण आणि सामाजिक जीवनात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अभिजात मराठी भाषा दिवस सप्ताहच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र सोनवणे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, तहसीदार प्रणाली तायडे यांची उपस्थिती होती.



यावेळी जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, मराठी भाषेला ३ ऑक्टोबर रोजी 'अभिजात भाषा' म्हणून मान्यता देण्यात आली. हा दिवस मराठी भाषेच्या आणि संस्कृतीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. महाराष्ट्रासारख्या पवित्र आणि समृध्द राज्यात आपाल जन्म झाला आहे. मराठी भाषेच्या विकासात मराठी चित्रपटांचे योगदानही मोठे असुन, यामुळे आपणांस प्रेरणा मिळते. मी मुळची राजस्थानची आहे, परंतु माझी कर्मभूमी महाराष्ट्र असल्याने मी मराठी भाषा अधिक चांगल्याप्रकारे शिकण्याचा प्रयत्न करत आहे. सद्य परिस्थितीत आपणांवर दूष्काळचे सावट आहे. या कठीण परिस्थितीचा आपणां सर्वांना सामना करायाचा आहे. यावेळी त्यांनी पाणी वाचवण्याचे आवाहन केले.

यावेळी प्रा.डॉ. सोनवणे म्हणाले की, मराठी साहित्याची परंपरा ही प्राचीन आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेच्या माध्यमातून आपल्या स्वराज्य आणि संस्कृती विस्तार झाला आहे. मराठी भाषेचे मोठे योगदान असल्याचे सांगून, मराठी भाषेने न्याय आणि समानता प्रस्थापित करण्याकरीता मोलाचे योगदान दिले आहे. मराठी भाषेला हा गौरव मिळवून देण्यासाठी अनेक मोठे साहित्यिक, लेखक, कवी आणि असंख्य मराठी भाषिकांनी मोलाचे योगदान दिले आहे. मराठी भाषा जागतिक स्तरावर पोहोचावी, तसेच मराठीला पुढे नेणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी कार्यक्रमास भारत स्काऊट गाईड संस्थेतील विद्यार्थी-विद्यार्थींनी, प्रशिक्षक-शिक्षक यांच्यासह विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# नगरपंचायत समोरील अतिक्रमण पाडलं

जालना । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-जालना रोडवरील बदनापूर व शेलगाव परिसरात महामार्गाच्या हद्दीत करण्यात आलेली अतिक्रमणे प्रशासनाने हटविली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली ही अतिक्रमण मोहीम राबविण्यात आली.



या कारवाईत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता सौ. प्रिया पुजारी, उपअभियंता राजेश डागुळे (उपविभाग, छत्रपती संभाजीनगर), कनिष्ठ अभियंता आरती राठोड व कनिष्ठ अभियंता श्रुती बिरारे, बदनापूर व चंदनझिरा पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच छत्रपती संभाजीनगर-जालना टोलवेजचे प्रकल्प प्रमुख यतींद्र कुमार पांडे, सुरक्षा प्रभारी विनायक सर्वज्ञ आणि संबंधित अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

महामार्गावरील वाहतूक सुरळीत राहावी, वाहनचालक व नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने ही अतिक्रमणे हटविण्यात आली. कारवाईपूर्वी संबंधित अतिक्रमणधारकांना नियमानुसार आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे हटविण्यात आली.

या कारवाईमुळे छत्रपती संभाजीनगर-जालना रोडवरील वाहतुकीला अधिक मोकळीक मिळण्यास तसेच वाहतूक सुरक्षित आणि सुरळीत होण्यास मदत होणार आहे. महामार्गाच्या हद्दीत अनधिकृत अतिक्रमण किंवा बांधकाम करू नये आणि सार्वजनिक वाहतूक व सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## निलंग्यात ८ ऑक्टोबरला 'व्होट बचाव, देश बचाव' मोर्चा

लातूर । प्रतिनिधी

काँग्रेस भवन येथे महाविकास आघाडी व इंडिया आघाडीतील घटक पक्षांची जिल्हास्तरीय संयुक्त बैठक झाली. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ८ ऑक्टोबर रोजी निलंगा येथे 'व्होट बचाव, देश - बचाव' मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली. सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंके यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत प्रश्न निर्माण झाले असून, एसआयआर प्रक्रियेमुळे महाराष्ट्रातील सुमारे दोन कोटी आणि लातूर जिल्ह्यातील दोन लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप केला. मुख्य निवडणूक आयुक्तांवर कारवाई करून भविष्यातील निवडणुका मतपत्रिकेवर घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली.मोर्चात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, शेकाप, माकप, स्वाभिमानी शेतकरी संघटना, समाजवादी पार्टी यांच्यासह समविचारी संघटना सहभागी होणार आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत, शेतमजुरांना २५ हजार रुपये अर्थसहाय्य, चारा छावण्या, मनरेगाच्या कामांवरील अटी शिथिल करणे, सरसकट पीकविमा आणि बटाईदार शेतकऱ्यांनाही मदत देण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

## रिपाइंची दुष्काळग्रस्तांना १०० ट्रक धान्याची मदत

### बीड जिल्ह्याला पहिला ट्रक रवाना, आठवले म्हणाले, पक्ष बौद्ध वाड्याच्या बाहेर न्या

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये यंदा दुष्काळ पडला असून शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी संकटात आहेत. त्यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (रिपाइं ) वतीने १०० ट्रक धान्याचा मोफत पुरवठा करण्यात येणार आहे, अशी घोषणा केंद्रीय




सामाजिक न्याय राज्यमंत्री व रिपाइं अध्यक्ष रामादास आठवले यांनी केली.नवी मुंबईतील वाशी येथील विष्णुदास भावे नाट्य मंदिरामध्ये रिपाइंचा ६९ वा वर्धापन दिन रविवारी मोठ्या थाटात पार पडला. त्यावेळी झालेल्या पक्ष कार्यकर्ता मेळाव्यात मंत्री आठवले यांनी दुष्काळग्रस्तांना मदतीचे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर सीमा आठवले, जित आठवले, रिपाइं राज्य अध्यक्ष राजा सरवदे, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, युवक आघाडी प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे,काकासाहेब खंबाळकर, बाबुराव कदम, गौतम सोनवणे, कोषाध्यक्ष एम. एस. नंदा उपस्थित होते.रिपाइं पक्ष केवळ बौद्धवाड्यापुरता मर्यादित ठेवायचा नाही. रिपाइं सर्व जाती-धर्मांचा पक्ष बनवायचा आहे. पक्षाची वाटचाल २८ राज्यांमध्ये व ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये होत असून नागालँड आणि मणीपूर या राज्यांमध्ये 'ऊस उत्पादक शेतकरी' हे निवडणूक चिन्ह पक्षाला मिळाले आहे. रिपब्लिकन पक्ष संघर्ष करणारा आहे. सामाजिक न्यायाची लढाई लढणारा पक्ष आहे. आपण सत्तेत नक्कीच आहोत, पण अन्याय झाला तर कोपऱ्यात शांत बसू नका. अन्यायाविरुद्ध रस्त्यावर उतरा, असे आवाहन मंत्री आठवले यांनी केले. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. महाडच्या चवदार तळे क्रांतीच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेला यंदाचा 'समता क्रांती मार्च' दुष्काळामुळे आपण रद्द केला आहे. दुष्काळामुळे होरपळणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांना मदत केली पाहिजे. त्यासाठी रिपब्लिकन पक्ष गरीब असला तरी शंभर ट्रक जीवनावश्यक वस्तूंची मदत दुष्काळग्रस्तांना पाठवणार आहे, असे मंत्री आठवले यांनी जाहीर केले. 'दुष्काळामुळे शेतकऱ्याचे पीक गेले जळून, तरी सरकार मदतीपासून नाही जाणार पळून' अशी चारोळी मंत्री आठवले यांनी केली.रिपब्लिकन पक्षाची ताकत कार्यकर्ते आहेत. ती ताकद कार्यकर्त्यांनी दाखवली पाहिजे. प्रत्येक वेळी मित्र पक्षाच्या मागे लागायचे नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपली ताकत दाखवा. आपले लोक निवडून आणा. त्यासाठी पक्ष बांधणी करा. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन पक्ष मजबूत करा, असे आवाहन मंत्री आठवले यांनी वर्धापन दिनाच्या कार्यकर्ता मेळाव्यामध्ये केले.

# गुजर समाज देवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी; नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय गुजर समाज देवसेनेच्या जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी नुकत्याच करण्यात आल्या. यामध्ये प्रा. युवराज डोंगर यांची जिल्हा सचिवपदी, प्रा. संजय खटाने यांची जिल्हा सहसचिवपदी, तर शहादेव भीमराव डोंगर यांची शिरूर तालुका अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा गुजर समाज बांधव व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी बोलताना गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर म्हणाले की, या निवडी केवळ पदासाठी नसून सामाजिक कार्याची जबाबदारी म्हणून करण्यात आलेल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या हातून समाजहिताचे कार्य घडावे, समाजाच्या प्रगतीसाठी विधायक उपक्रम राबविले जावेत आणि त्यांच्या माध्यमातून समाजाची एकजूट अधिक मजबूत व्हावी, हीच अपेक्षा आहे.

गुजर समाजाची संघटना ही कोणत्याही एका राजकीय पक्षाशी संबंधित नसून सामाजिक एकजुटीच्या उद्देशाने कार्यरत आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या विचारानुसार कोणत्याही राजकीय पक्षाचे काम करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र, समाजाच्या हिताचा प्रश्न निर्माण झाल्यास सर्वांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे समाजाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणे आवश्यक आहे. नवनियुक्त पदाधिकारी ही जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडतील, असा विश्वासही रतन गुजर यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, गुजर समाजाची संघटना केवळ जिल्ह्यापुरती मर्यादित नसून तिचे कार्य देशभर विस्तारलेले आहे. समाजातील आमदार, खासदार, मंत्री तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या समाजबांधवांशी संपर्क व समन्वय वाढविणे, समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे आणि समाजहिताच्या विषयांवर व्यापक पातळीवर काम करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. समाजातील विविध स्तरांवरील व्यक्तींमध्ये संपर्काची साखळी निर्माण करण्याच्या दृष्टीने हे कार्य महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी उपस्थित समाजबांधवांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे तोंडभरून कौतुक करून त्यांना पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास महादेव डोंगर सर, संतोष डोंगर, नरेंद्र डोंगर, गणेश डोंगर, सुनील डोंगर, बाळासाहेब डोंगर, संजय डोंगर, ह.भ.प. राम महाराज डोंगर, ह.भ.प. पंढरीनाथ महाराज डोंगर, संदीप डोंगर, श्रीरंग डोंगर, गणीभाई शेख, राहुल डोंगर, सूर्यकांत डोंगर, नाना डोंगर, संजय डोंगर यांच्यासह गुजर समाज बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराचा कळस! घरकुल लाभार्थ्यांचा पहिला हप्ता दुसऱ्याच्याच खात्यात;पंचायत समिती भ्रष्टाचाराचा अड्डा

परतुर । प्रतिनिधी

परतुर पंचायत समिती भ्रष्टाचाराचा अड्डा झाला असून याप्रकरणी आमदार बबनराव लोणीकर यांनी लक्ष देणे गरजेचे आहे असे सामान्य नागरिकाकडून बोलले जात आहे.

शासकीय योजनांमधील सावळागोंधळ आणि अधिकार्यांच्या मनमानी कारभाराचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गरिबांना हक्काचे घर मिळवून देणाऱ्या घरकुल योजनेच्या पहिल्या हप्त्याची रक्कम मूळ लाभार्थ्याला न मिळता, ती चक्क दुसऱ्याच व्यक्तीच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. हा सर्व प्रकार मुकेश आढे आणि गटविकास अधिकारी (इऊज) यांच्या संगनमताने (मिळतीजुळती भागीदारी) झाल्याचा थेट आरोप पीडित लाभार्थ्याने केला आहे.

काय आहे नेमके प्रकरण?

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पीडित लाभार्थी हा हक्काच्या घरासाठी अनेक दिवसांपासून शासकीय कार्यालयाचे उंबरठे झिजवत होता. अखेर त्याचे नाव मंजुरीच्या यादीत आले. नियमानुसार घरकुलाचा पहिला हप्ता लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा होणे आवश्यक होते. मात्र, प्रत्यक्षात हा हप्ता मूळ लाभार्थ्याला मिळालाच नाही. जेव्हा लाभार्थ्याने बँकेत आणि शासकीय कार्यालयात जाऊन चौकशी केली, तेव्हा ही रक्कम दुसऱ्याच्याच खात्यात वळवण्यात आल्याचे उघड झाले.

चौकशी करायला गेल्यावर उडवाउडवीची भाषा

आपला हक्काचा पैसा दुसऱ्याच्या खात्यात कसा गेला, याचा जाब विचारण्यासाठी जेव्हा पीडित लाभार्थी आणि त्याचे नातेवाईक मुकेश आढे आणि संबंधित बीडीओ (इऊज) यांच्याकडे गेले, तेव्हा त्यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देण्यात आली. चूक मान्य करून त्यावर तोडगा काढण्याऐवजी दोघांनीही उडवाउडवीची उत्तरे देत लाभार्थ्याला हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. जे करायचे ते करा, आमचे कोणी काही वाकळे करू शकत नाही, अशा आविर्भावात या अधिकाऱ्यांनी आणि संबंधित व्यक्तीने पीडिताशी संवाद साधल्याचे समजते.

पीडित लाभार्थ्याची न्यायासाठी धाव

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या लाभार्थ्याने आता वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आणि पोलिसांत दाद मागण्याची तयारी सुरू केली आहे. मुकेश आढे आणि बीडीओ यांच्या या संगनमताची (लाचलुचपत किंवा भ्रष्टाचाराची) सखोल चौकशी व्हावी आणि दोषींवर तात्काळ कडक कारवाई करून आपला हक्काचा पहिला हप्ता परत मिळावा, अशी मागणी लाभार्थ्याने केली आहे.

सर्वसामान्यांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या अशा अधिकाऱ्यांवर आणि त्यांच्या हस्तकांवर वरिष्ठ प्रशासन काय कारवाई करणार, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# नाथसागराचे १० टीएमसी पाणी आरक्षित करून चकलांबा-खळेगाव परिसरासाठी कॅनलद्वारे द्यावे

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा-खळेगाव परिसरातील दुष्काळग्रस्त गावांचा कायमस्वरूपी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी नाथसागर (जायकवाडी) धरणातील किमान १० टीएमसी पाणी आरक्षित करून उपकॅनल, कालवा अथवा बंद पाइपलाइनद्वारे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत मा. ना. पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना निवेदन देण्यात आले आहे. परिसरातील अनेक गावे गेल्या अनेक वर्षांपासून अनियमित पाऊस, पाणीटंचाई, घटती भूजल पातळी, शेतीतील उत्पादनाची अनिश्चितता तसेच जनावरांच्या चारा व पाण्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. त्यामुळे या भागासाठी तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी जलव्यवस्था निर्माण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नाथसागर-चापडगाव-बोधेगाव-चकलांबा या दिशेने योग्य तांत्रिक मार्ग निश्चित करून स्वतंत्र उपकॅनल किंवा बंद पाइपलाइन



योजनेचे तातडीने सर्वेक्षण करावे. तसेच प्रस्तावित मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून उंचीतील फरक, पाण्याची उपलब्धता, जलवाहक क्षमता, अंदाजित खर्च आणि लाभक्षेत्र यांचा सविस्तर तांत्रिक अहवाल तयार करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या पाणी योजनेत चकलांबा, रसुलाबाद, हिवरवाडी, मांडूळा, पौळाचीवाडी, खळेगाव, बंगाली पिंपळा, ब्रह्मगाव, कुंभेजळगाव, माटेगाव, उमापूर, देवपिंपरी, राजपिंपरी, पांढरवाडी, गोविंदवाडी, रुई, शिरसदेवी यांसह परिसरातील इतर दुष्काळग्रस्त गावांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच चकलांबा परिसरातील तलाव, बंधारे, पाझर तलाव आणि अमृता नदी व तिच्या परिसरातील बंधाऱ्यांना नाथसागरच्या पाण्याशी जोडण्याची शक्यता तपासावी, अशीही मागणी आहे. या प्रश्नावर जिल्हाधिकारी, जलसंपदा विभाग, महसूल विभाग व संबंधित लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन कालबद्ध कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

नाथसागरचे पाणी योग्य तांत्रिक नियोजनातून चकलांबा-खळेगाव परिसरातील दुष्काळग्रस्त गावांपर्यंत पोहोचल्यास शेती, पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी मोठा आधार मिळू शकतो, अशी अपेक्षा शेतकरी व ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## कै. सुभाषराव नरवडे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त इंदोरीकर महाराजांचे कीर्तन -जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

कै. सुभाषराव रामराव नरवडे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या कीर्तनाचे आयोजन बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सुलतानपूर-माळेवाडी येथील मारोती मंदिरासमोर हा कीर्तन सोहळा होणार आहे. या कार्यक्रमास परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांनी केले आहे.



इंदोरीकर महाराजांच्या कीर्तनातून सामाजिक प्रबोधनासोबतच आध्यात्मिक विचारांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे. कीर्तनाच्या दिवशी दुपारी १ वाजल्यापासून उपस्थितांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. कीर्तनाची वेळ सायंकाळी ५ ते ७ अशी असून, वेळेवर सुरू होणाऱ्या या कार्यक्रमास सर्व गुणिजनांनी उपस्थित राहावे, असे आवाहन

सभापती जयदत्त अण्णा नरवडे, अशोक नरवडे, अंकुश नरवडे, डॉ. ज्ञानेश्वर नरवडे, शशिकांत नरवडे, संजय नरवडे, संतोष नरवडे, डॉ. कैलास नरवडे, डॉ. बाबासाहेब नरवडे व समस्त नरवडे परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचे रखडलेले मानधन तात्काळ द्या

### माजलगाव शहर काँग्रेस कमिटीचे तहसीलदारांना निवेदन; अन्यथा आंदोलनाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत तालुक्यातील वृद्ध,दिव्यांग, विधवा व अनाथ लाभार्थ्यांना मागील दोन महिन्यांपासून शासनाकडून मिळणारे मानधन थकीत आहे. हे मानधन तात्काळ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावे, अशी मागणी माजलगाव शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




या योजनेतून मिळणारे अत्यल्प मानधन हेच अनेक निराधार लाभार्थ्यांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे. मात्र, मागील दोन महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे वृद्ध, दिव्यांग, विधवा तसेच अनाथ लाभार्थ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. दैनंदिन गरजा, औषधोपचार आणि घरखर्च भागविताना त्यांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शासकीय स्तरावर किंवा बँकेकडे चौकशी केली असता तांत्रिक अडचणी अथवा निधीअभावी मानधन रखडल्याचे सांगण्यात येत असल्याचा आरोप काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाने याप्रकरणी तातडीने लक्ष घालून सर्व पात्र लाभार्थ्यांचे मागील दोन महिन्यांचे थकीत मानधन कोणत्याही विलंबाशिवाय त्यांच्या बँक खात्यावर जमा करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने पुढील ९ दिवसांत याबाबत सकारात्मक कार्यवाही न केल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व निराधार लाभार्थ्यांना सोबत घेऊन तहसील कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन व धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही काँग्रेसच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. गरजू व निराधार लाभार्थ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने थकीत मानधन वितरित करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. माजलगाव शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने दिलेल्या निवेदनावर जिल्हा व तालुका काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## दहावी-बारावीची फी माफ करण्याचा शासन निर्णय असताना विद्यार्थ्यांकडून फी वसुली का? - जागर प्रतिष्ठानचा सवाल!

बीड । प्रतिनिधी

शासनाने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, काही शाळांकडून अद्याप विद्यार्थ्यांकडून फी घेतली जात असल्याच्या तक्रारी आहेत. शासनाचा निर्णय तात्काळ लागू करून विद्यार्थ्यांकडून कोणतीही फी घेऊ नये, अशी ठाम मागणी जागर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली.

यासोबतच महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये तात्काळ मदत द्यावी आणि बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप २०२५-२६ हंगामासाठी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली हेक्टरी



१७,५०० पीकविमा मदत तात्काळ देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.दुष्काळाच्या पाहणी दौऱ्यावर असलेल्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना जागर प्रतिष्ठानच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी जागर प्रतिष्ठानचे गेवराई तालुका कार्याध्यक्ष जीवन राठोड, अतुल नरवडे, गणेश बोराडे, गोरख चव्हाण व पवन राठोड आदी उपस्थित होते.

## नात्यांच्या दृढीकरणासाठी कुटुंबात रामायण-महाभारतातील कथा आवश्यक - सुनंदा खांडेकर

माजलगाव । प्रतिनिधी

सध्याच्या सामाजिक आणि कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता राष्ट्रीय विचारांची पिढी घडवण्यासाठी तसेच नातेसंबंध दृढ करण्यासाठी रामायण आणि महाभारतातील कथा प्रत्येक कुटुंबात सांगितल्या गेल्या पाहिजेत. त्या कथांमुळेच नाती घट्ट होण्यास आणि पर्यायाने सामाजिक वातावरण निकोप होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षिका सुनंदा खांडेकर यांनी केले.




भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष आणि श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त शहरातील श्री केदारनाथ मंदिरात आयोजित द्वितीय कुटुंब मेळाव्यात त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्यांनी पंचपरिवर्तनातील विषयांवर मार्गदर्शन केले. भाषा, भूषा, भजन, भोजन, भुवन आणि भ्रमण या सहा विषयांचे कुटुंबातील महत्त्व विशद केले. पर्यावरण रक्षणाविषयी देखील कुटुंबात चर्चा होणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. स्वबोधाच्या माध्यमातून कुटुंबातील प्रत्येकाचा आत्मविश्वास वाढला पाहिजे, तसेच नागरिक कर्तव्यांची सुरुवात ही कुटुंबातूनच व्हावी, असा आग्रहही त्यांनी धरला.

यावेळी शालेय समिती अध्यक्ष प्रशांत भानप यांनी मनोगत व्यक्त केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेचा ◀◀ पान ३ वर

## दुष्काळी परिस्थितीत पालिकेने उपाय योजना न केल्यास आंदोलन- डॉ योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

शासनाने बीड तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून, या पार्श्वभूमीवर शहरात निर्माण झालेली पाणी टंचाई आणि विविध नागरी समस्या तातडीने सोडविण्याच्या मागणीसाठी भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंगळवारी (दि.६) नगरपरिषद प्रशासनाला निवेदन दिले. या गंभीर समस्यांवर कालमर्यादेत ठोस निर्णय घेऊन उपाययोजना न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपच्या वतीने देण्यात आला.



भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह भाजपचे नगरसेवक आणि उमेदवारांनी आपापल्या प्रभागातील विविध समस्यांचे निवेदन प्रशासनाकडे सादर केले. शहरातील पाणीटंचाई लक्षात घेता नळजोडणी नसलेल्या तसेच टंचाईग्रस्त भागांत अधिकृत टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा करावा, नवीन पाईपलाईनसाठी डीपीसीकडून तातडीने निधी मंजूर करून घ्यावा. टँकर वितरणातील गैरव्यवहार रोखण्यासाठी सर्व टँकर्सवर जीपीएस आणि क्यूआर कोड प्रणाली अनिवार्य करावी. तसेच शाहूनगर, बार्शी रोड आणि धानोरा रोड येथील पाणी भरणा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवून कडक देखरेख ठेवावी. अमृत अटल पाणीपुरवठा योजनेतील प्रलंबित क्रॉसिंगची कामे पूर्ण करावीत. पालिकेचा वीज खर्च कमी करण्यासाठी 'महाऊर्जा'च्या सहकार्याने समनापूर रोडवरील जागेवर ◀◀ पान ३ वर

## बीड शहरामध्ये पाणी टंचाई चे संकट

### प्रशासन आणि पालिका प्रशासन उदासीन-नितीन जायभाये

बीड । प्रतिनिधी

बीड शहरांमध्ये निर्माण झालेल्या प्रचंड भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर काही नेते नगरपालिकेच्या प्रशासना सोबत बैठका करत आहेत. परंतु या सर्वांना बीड शहर बचाव मंचाच्या अध्यक्ष या नात्याने मी प्रश्न विचारत आहे की तुम्ही गेली ३५-४० वर्ष सत्तेत राहून काय केल ?; अटल अमृत जल योजनेच काय केल ? अटल अमृत जल योजना अपूर्ण का राहिली ? अयशस्वी का झाली ?

आज अकस्मात गंभीर होत या बैठका करणाऱ्या नेत्यांच्या हातात एक हाती सत्ता असताना सुद्धा यांना बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचे प्रश्न यापूर्वी दिसले नव्हते का ? आज बीड शहरावर ही वेळ का आली ? आता इथून पुढ वर्षभर कोरड्या दुष्काळ काळामध्ये नागरिकांनी काय करायच, कसं जगायचं ? पुढच्या वर्षी पाऊस पडेपर्यंत बीड शहराची तहान कशी भागणार ?



अतिशय प्रचंड भीषण पाणी टंचाईचे संकट यावर्षी बीड शहरावर येत आहे.

नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये नक्की काय चाललं आहे. प्रचंड बोगसगिरी आणि भ्रष्टाचार तिथं माजलेला आहे. कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार तिथ होत आहे. बीड शहरामध्ये अनाधिकृत नळ कनेक्शनची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. हजारो नळ कनेक्शन (हा आकडा खूप प्रचंड मोठा आहे) हे बोगस आहेत. जे नळ कनेक्शन्स नोंदणीकृत नसून अनाधिकृत आहेत याची खरी आकडेवारी नगरपालिकेने तात्काळ जाहीर करावी. नगरपालिकेमध्ये चांगल्या अधिकाऱ्यांना टिकू दिले जात नाही, काम करू दिले जात नाही. लोकांच्या मागण्या, अर्ज, निवेदने याला सरळ कचऱ्याची टोपली दाखवण्यात येते. काही वार्डांमध्ये गुंडगिरी पद्धतीचा अवलंब केला जातो असा काही अधिकाऱ्यांचा सुद्धा अनुभव राहिलेला आहे. नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागा च्या अंतर्गत काही वार्डांमध्ये कुणीही उठतो आणि गुत्तेदार होतो आणि ◀◀ पान ३ वर

## ईट -नाळवंडी- मोज येथील जलजीवन मिशनच्या कामाच्या चौकशीचे आदेश

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नाळवंडी - ईट - मौज येथील जलजीवन मिशनच्या कामाची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी संबंधित उप अभियंता व नाबार्ड तसेच टाटा कन्सल्टन्सी या एजन्सीला दिले आहेत. या संदर्भात विलास भिसे यांनी शासनाकडे तक्रार केलेली आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी आपल्या आदेशात म्हटले आहे की जलजीवन मिशन अंतर्गत जॅकवेल विहीर व संबंधित योजनेच्या कामाबाबत चौकशी समिती नेमावी व या चौकशी समितीच्या माध्यमातून इट, नाळवंडी,मौज येथील कामाची चौकशी सात दिवसाच्या आत करून अहवाल सादर करावा यासंदर्भात विलास भिसे यांनी केलेल्या तक्रारीवरून प्रत्यक्ष चौकशी दरम्यान आढळून आलेल्या वस्तुस्थितीचा सविस्तर अहवाल आवश्यक कागदपत्रासह तसेच आपल्या स्पष्ट अभिप्राय नमूद करून हा अहवाल समंधितास देऊन त्याची एक प्रत कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात सादर करावी. ही चौकशी तात्काळ करण्यात यावी असेही कार्यकारी अभियंता यांच्या आदेशात म्हटले आहे. बीड तालुक्यासाठी नाबार्ड कन्सल्टन्सी चे पवन मानकर तसेच टाटा कन्सल्टंसी याबरोबरच उपअभियंता सानप, खटाणे, सातपुते, गपाट यांनाही आदेशित करण्यात आले आहे.

## वाळुंज जमीन प्रकरणात राम खाडे यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती : विष्णू खाडे

### जुना व पूर्वीच मिटलेला वाद पुन्हा उकरून काढण्याचा आरोप; प्राजक्ताताई धस यांचा जमीन व्यवहाराशी कोणताही संबंध नसल्याचा दावा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वाळुंज गावातील जमीन व पिकाच्या वादाचे प्रकरण सध्या पुन्हा चर्चेत आले असून, या प्रकरणाबाबत चुकीची व अपुरी माहिती प्रसारित करून गैरसमज निर्माण केला जात आहेत तर या जमिनीचा आणि आदिवासी समाजातील व्यक्तींचा दूरपर्यंत कसलाही संबंध नसल्याचे देखील खाडे म्हणाले आरोप वाळुंजचे माजी सरपंच विष्णू खाडे यांनी केला आहे. संबंधित जमीन व्यवहार, तिचे संपादन, परतावा आणि त्यानंतर निर्माण झालेला पिकाचा वाद यांचा संपूर्ण घटनाक्रम उपलब्ध शासकीय कागदपत्रे व प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या आधारे पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विष्णू खाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाळुंज व तवलवाडी गावाच्या शिवारा नजीक सहस्त्रबुद्धे नामक व्यक्तीची गट क्रमांक ६७ मध्ये जमीन होती. सदर जमीन पूर्वी तलवार प्रकल्पासाठी शासनाकडून संपादित करण्यात आली होती. जमीन संपादनाच्या वेळी नियमानुसार मूळ जमीनमालकास शासनाकडून मावेजा अदा करण्यात आला होता. मात्र,



प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्पासाठी आवश्यकतेपेक्षा काही जमीन अधिक प्रमाणात संपादित झाल्याचे निदर्शनास आले.

यानंतर शासनाने मूळ जमीनमालकास नोटीस बजावून अतिरिक्त संपादित जमिनीबाबत पूर्वी अदा केलेला मावेजा शासनाकडे जमा करून घेतला आणि प्रकल्पासाठी आवश्यक नसलेली अतिरिक्त जमीन मूळ जमीनमालकास परत करण्यात आल्याचा घटनाक्रम असल्याचे खाडे यांनी सांगितले.

यानंतर संबंधित जमीन रघुनाथ पवार यांनी कसण्यासाठी बटाईने घेतली होती. पवार यांनी या जमिनीवर पीक घेतले होते. मात्र, या पिकावरून काही स्थानिक व्यक्तींशी वाद निर्माण झाला. संबंधित व्यक्तींकडून आपल्याला धमक्या दिल्या जात असून पिकाची काढणी करण्यास अडथळा निर्माण केला जात असल्याची माहिती रघुनाथ पवार यांनी आमदार सुरेश धस यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांना दूरध्वनीद्वारे दिली आणि मदतीची विनंती केली.

या फोननंतर प्राजक्ताताई धस काही कार्यकर्त्यांसह संबंधित ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26